महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतीक्षा रवींद्र घोडविंदे (एमडी)

शुक्रवार ■ 07 फेब्रुवारी 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 223 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

थोडक्यात महत्वाचे

# जनता दरबार कुठेही घेणार – वन मंत्री गणेश नाईक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे हे आपले सर्वांचेच असल्याचे सांगत या शहरातील अडीअडचणी सोडविण्यासाठी गरज पडली तर, अधिकाऱ्यांची बैठक घेऊ, असे विधान वनमंत्री गणेश नाईक यांनी बुधवारी रात्री ठाण्यात पत्रकारांशी बोलताना केले. तसेच जनता दरबार कोणीही कुठेही घेऊ शकतो, असा पुनरुच्चार करत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या मंत्र्यांनाही नवी मुंबईत जनता दरबार घेण्यास सांगितले असल्याचे ते म्हणाले.

ठाणे येथील पाचपाखाडी भागात वंदे मातरम संघाच्या वतीने माघी गणेशोत्वासाचे आयोजन करण्यात आले असून येथे बुधवारी रात्री वनमंत्री गणेश नाईक हे दर्शनासाठी आले होते. त्यावेळी त्यांनी पत्रकारांशी बोलताना जनता दरबारबाबत भाष्य केले. ठाणे जिल्ह्याचा अधिकृत संपर्कमंत्री म्हणून माझी नेमणुक झाली आहे. तर, पालघर जिल्ह्याचा मी पालकमंत्री आहे, असे नाईक म्हणाले. जनता दरबार कोणी कुठेही घेऊ शकतो. महायुतीच्या सर्व मंत्र्यांनी जिकडे पाहिजे तिकडे हा जनता दरबार घ्यावा. जनता दरबार म्हणजे लोकांच्या अडीअडचणी समजून घेणे आणि त्या दूर करणे. यात काहीच वावग नाही, असे नाईक म्हणाले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या मंत्र्यांनाही सांगितले आहे की, नवी मुंबईत जनता दरबार घ्या, असेही ते म्हणाले.

# सिडकोचे द्रोणागिरी प्रकल्पग्रस्तांना पुन्हा भूखंडाचे आश्वासन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

उरण : सिडकोकडून बोकडवीरा आणि परिसरातील प्रकल्पग्रस्तांचे प्रलंबित साडेबारा टक्केचे भूखंड वाटप करण्याचे पुन्हा एकदा आश्वासन दिले आहे. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांमध्ये आशा निर्माण झाली आहे. यासंदर्भात नुकताच सिडको भवन येथे एक बैठक झाली. या बैठकीत सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख यांच्या उपस्थितीत ही बैठक पार पडली. यात प्रकल्पग्रस्तांना भूखंड वाटपाचे आश्वासन देण्यात आले आहे. या बैठकीला आजी माजी आमदार आणि विविध पक्षांचे राजकीय नेतेही उपस्थित होते.

मार्च १९९० मध्ये शासनाने सिडको प्रकल्पग्रस्तांना विकसित साडेबारा टक्के भूखंड देण्याचा शासन आदेश काढल्यानंतर ही उरण मधील शेकडो प्रकल्पग्रस्त आणि वारसांना गेल्या ३५ वर्षांपासून प्रतीक्षा आहे. उरण मध्ये द्रोणागिरी नोडची उभारणी केली जात आहे. यात साडेबारा टक्के विकसित भूखंडाचे वाटप करण्यात येत आहे. मात्र २००८ मध्ये द्रोणागिरी नोडमधील भूखंडाचे इरादापत्र देण्यात आले होते. यातील अनेक प्रकल्पग्रस्त आजही भूखंडाच्या प्रतीक्षेत आहेत. तर अनेकांना पात्रताही मंजूर झालेली नाही. या प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्के विकसित भूखंड देण्याचे आश्वासन रायगड जिल्ह्याचे तत्कालीन पालकमंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत दिले होते. जवळपास पाचशे पेक्षा अधिक प्रकल्पग्रस्तांचे भूखंड वाटपासाठी सिडकोच्या भूमी व भूमापन विभागाकडून भूखंड शोध मोहीमही राबविण्यात आली होती. मात्र या आश्वासनाची आज पर्यंत अंमलबजावणी झालेली नाही.

# मध्य, पश्चिम रेल्वेच्या तीनशे अतिरिक्त लोकल फेऱ्या

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : जगभरातील सर्वाधिक गुंतागुंतीच्या वाहतुकीपैकी एक म्हणजे मुंबईतील लोकल सेवा. मुंबईतील महत्त्वाच्या गर्दीच्या स्थानकांतून काही मिनिटांतमध्ये लोकलची एक फेरी होते. त्यामुळे अतिरिक्त लोकल फेऱ्या वाढवण्यावर मर्यादा येत आहेत. सध्या लोकल मार्गिकेवरील ताण कमी करण्यासाठी दोन लोकलमधील अंतर कमी करण्यावर भर दिला जात आहे. मुंबईच्या लोकल मार्गावर अत्याधुनिक कवच ४.० प्रणाली राबविण्यात येणार आहे. या प्रणालीमुळे दोन लोकलमधील १८० सेकंदाचे अंतर १५० सेकंदावर येणार आहे. परिणामी, येत्या काळात अतिरिक्त ३०० लोकल फेऱ्यांची भर पडेल, असा दावा रेल्वेमंत्री आश्विनी वैष्णव यांनी केला.

# सामाजिक दायित्व कॉर्पोरेटसह प्रत्येक नागरिकाची जबाबदारी – राज्यपाल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई, 6 फेब्रुवारी : सामाजिक दायित्व ही केवळ कॉर्पोरेटसची जबाबदारी नसून सामाजिक दायित्व प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. सर्वसमावेशक व संवेदनशील समाज निर्मितीसाठी प्रत्येकाने समाजासाठी आपले योगदान दिले पाहिजे, असे प्रतिपादन राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी आज येथे केले. इन्स्टिट्यूट ऑफ डायरेक्टर्स (IOD) या संस्थेतर्फे कॉर्पोरेट सामाजिक दायित्व या विषयावर आयोजित १९ व्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन राज्यपाल राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुवारी (दि. ६)




हॉटेल ताज लँड्स एंड, मुंबई येथे झाले, त्यानेही ते बोलत होते. माजी सरन्यायाधीश व IOD चे सहअध्यक्ष न्या. उदय लळीत, चार्ल्स ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक जोस चार्ल्स मार्टिन, इन्स्टिट्यूट ऑफ डायरेक्टर्सचे अध्यक्ष ले. जन. सुरिंदर नाथ, 'सेबी'चे माजी अध्यक्ष अजय त्यागी, IOD च्या पश्चिम क्षेत्राचे अध्यक्ष व राज्याचे माजी मुख्य सचिव सीताराम कुंटे तसेच IODचे महासंचालक अशोक कपूर यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते. विविध संस्थांनी आपला सामाजिक दायित्व निधी वेगवेगळ्या क्षेत्रात खर्च केला तर त्याची फलनिष्पत्ती प्रभावी होणार नाही, असे सांगून कॉर्पोरेट्स संस्थांनी सामाजिक दायित्व निधी निवडक क्षेत्रांमध्ये खर्च केल्यास ते अधिक परिणामकारक ठरेल असे राज्यपालांनी सांगितले.

टाटा व बिर्ला यांनी अतिशय प्रतिकूल काळात सामाजिक दायित्व निधीतून समाजासाठी व्यापक कार्य करताना समाजसेवेचा वस्तूपाठ पुढे ठेवला व त्यामुळे त्यांच्या नावासोबत विश्वास जोडला गेला, असे राज्यपालांनी सांगितले. कॉर्पोरेट सामाजिक दायित्वामध्ये शहर दत्तक घेऊन त्याला इंदोरप्रमाणे देशातील सर्वात स्वच्छ शहर बनवता येईल. या दृष्टीने विचार झाला पाहिजे असेही त्यांनी सांगितले.

# वाल्हिवरे आश्रम शाळा विद्यार्थी आत्महत्या प्रकरणी चार कर्मचारी निलंबित!




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड दि. ६- मुरबाड तालुक्यातील वाल्हिवरे अनुदानित आश्रम शाळेत इयत्ता दहावी मध्ये शिकणाऱ्या १६ वर्षाच्या विद्यार्थ्यांनी झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शनिवारी संध्याकाळी घडल्याने आश्रम परिसरात खळबळ उडाली आहे.

या घटनेची लोकसेवा शिक्षण संस्था मुरबाड यांनी तात्काळ दखल घेऊन आश्रम शाळेतील सुभाष रावते आत्महत्या प्रकरणी शालेय चार कर्मचारी निलंबित केले आहे. याबाबत लोकसेवा शिक्षक संस्था मुरबाड यांनी ४फेब्रुवारी २०२५ रोजी लोकसेवा शिक्षण संस्था मुरबाड या कार्यकारिणीने एक मुखी ठराव घेऊन संदीप देशमुख (माध्यमिक मुख्याध्यापक),किरण सुरोशे (प्राथमिक मुख्याध्यापक) , दिलीप पवार (अधिक्षक), किरण मोहपे (दहावी वर्ग शिक्षक) या चारजणांना सुभाष रावते आत्महत्या प्रकरणी. संस्थेने संस्था स्तरावर चौकशी समिती नेमली असून चौकशी समितीच्या माध्यमाने मुलाच्या मृत्यूचा तपास घेण्याचे काम सुरू करण्यात आले आहे .सदर चौकशी अहवालात दोषी आढळणाऱ्यांना संस्था पाठीशी न घालता त्यांची गय करणार नाही असे संस्थेचे धोरण असून आदिवासी विद्यार्थ्यांच्या जीवावर उठणाऱ्या कर्मचाऱ्यांची गय केली जाणार नाही अशी प्रतिक्रिया संस्थेचे सचिव गोविंद घावट यांनी दिली आहे.वाल्हिवरे अनुदानित आश्रम शाळेत इयत्ता १०वी) किन्हवली खोरेपाडा तालुका जव्हार जि. पालघर येथील रहिवासी आहे याबाबत टोकावडे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे याबाबत टोकावडे पोलीस ठाण्याचे पोलीस सुभाष रावते आत्महत्या प्रकरणी सखोल चौकशी टोकावडे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी दिनकर चकोर हे करीत आहेत

# ठाणे जिल्हा परिषदेची 'स्मार्ट' वाटचाल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रभावामुळे विविध क्षेत्रांमध्ये डिजिटल क्रांती होत आहे. मात्र, शासकीय यंत्रणेत आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे हे मोठे आव्हान असते. याच आव्हानाला सामोरे जात ठाणे जिल्हा परिषद डिजिटल युगात पाऊल टाकताना दिसत आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या वर्षभरात विविध योजनांसाठी स्मार्ट ॲप्लिकेशन्स विकसित करण्यात आली आहेत. विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता चाचणीसाठी 'दिशा ॲप', मानसिक आरोग्य तपासणीसाठी 'मायका', तसेच नव्याने सुरू होणारे 'आदर्श आपले सरकार केंद्र' यासर्व ॲप्सच्या मदतीने ठाणे जिल्हा परिषद स्मार्ट प्रशासनाच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे दिसून येत आहे.




तंत्रज्ञानाच्या वापरामुळे अनेक कामे सोपे आणि सहजपद्धतीने होतात. या तंत्रज्ञानाचा वापर ग्रामीण भागातील नागरिकांसाठी केला तर, तंत्रज्ञानाची माहिती त्यांना होईल आणि त्यांची याबाबत असलेली भिती दूर होईल, या उद्देशाने ठाणे जिल्हा परिषद प्रशासनाने गेल्या वर्षेभरात विविध ॲप्लिकेशन तसेच संकेतस्थळाची निर्मिती केली आहे. जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता सुधारावी यासाठी दिशा प्रकल्प आंमलात आणला आहे. या प्रकल्पा अंतर्गत एक ॲप्लिकेशन तयार केले आहे. त्या ॲप्लिकेशनवर विद्यार्थ्यांची चाचणी घेतली जाते. हे ॲप्लिकेशन कृत्रिम बुद्धिमत्त (एआय) चा वापर करुन तयार करण्यात आले आहे. या ॲप्लिकेशनमुळे जिल्हा परिषद शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याची गुणवत्ता स्तर समजण्यास मदत होत असून शिक्षकांना प्रत्येक विद्यार्थ्यांकडे विशेष लक्ष देता येत आहे. तर, मानसिक आरोग्य जपण्यासाठी 'मायका' ॲपची निर्मिती करण्यात आली आहे.

कामाच्या वाढत्या तणावामुळे कर्मचारी अनेकदा मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. तणाव, चिंता, नैराश्य यांसारख्या समस्या वाढत असल्याने, कामाच्या ठिकाणी मानसिक आरोग्याला प्राधान्य देणे गरजेचे आहे. या उद्देशाने हे ॲप विकसित करण्यात आले आहे. यात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) सहाय्याने चॅटबॉटच्या माध्यमातून मार्गदर्शन उपलब्ध आहे. मानसिक आरोग्य विषयीच्या शंका दूर करण्यासाठी आणि तज्ज्ञांचा सल्ला घेण्यासाठी या ॲपचा उपयोग होत आहे. ठाणे जिल्हा परिषदेने 'आदर्श आपले सरकार केंद्र' असे घरपोच दाखल्यांची सुविधा देणारे ॲप्लिकेशन तयार करण्याचे काम हाती घेतले आहे. यामध्ये ग्रामपंचायत विभागाकडून उपलब्ध होणारे जन्म नोंद, मृत्यू नोंद, विवाह नोंद, दारिद्रीरेषेखालील, ग्रामपंचायत येणे बाकी नसल्याचा, नमुना ८ चा उतारा आणि निराधार असल्याचा दाखला असे सात दाखले तसेच महसुल विभागाचे काही दाखले उपलब्ध होणार आहेत. यामध्ये नागरिकांना घरबसल्या पाहिजे त्या दाखल्यासाठी अर्ज करता येणार आहे. हा अर्ज नागरिकांना घरपोच उपलब्ध व्हावा यासाठी जिल्हा परिषद एका कंपनी सोबत करार करणार असून त्या कंपनीचा व्यक्ती नागरिकांना दाखला घरी जाऊन देणार आहे. हे ॲप्लिकेशन येत्या १५ ते २० दिवसांत सुरु होईल अशी माहिती जिल्हा परिषदेमार्फत देण्यात आली.

# खोखो विश्वचषक विजेत्या रेश्मा राठोडचं बदलापुरात जंगी स्वागत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

भारताच्या खोखो संघाने यंदा खोखो विश्वचषक जिंकत देशाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला. या जगज्जेत्या संघात बदलापूरच्या रेश्मा राठोडचाही समावेश होता. विश्वचषक जिंकून बदलापुरात आल्यानंतर रेश्माच्या शिवभक्त विद्यामंदिर शाळेने तिची जंगी मिरवणूक काढली. ढोल ताशांच्या गजरात विद्यार्थ्यांनी रेश्माचं स्वागत केलं. यावेळी जेसीबी मधून रेश्मावर फुलांची उधळण ही करण्यात आली शाळेचे अध्यक्ष, शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे सुद्धा उपस्थित होते.Vo : बंजारा या भटक्या विमुक्त समाजातून आलेल्या रेश्माची आई आणि वडील आजही नाका कामगार म्हणून काम करतात. आज रेश्माच्या विजयी मिरवणुकीत तिची आई अभिमानानं पारंपरिक वेशभूषेत सहभागी झाली होती. आम्ही नाका कामगार आहोत, अतिशय गरिबीत रेश्मा वाढली, पण आम्ही तिला फक्त जन्म दिला, तिला घडवण्याचं काम तिच्या शाळेने आणि प्रशिक्षकांनी केलं, आणि आज आमच्या मुलीने आमचं आणि शाळेचं नाव देशात गाजवलं, अशी प्रतिक्रिया रेश्माची आई धमी बाई राठोड यांनी दिली. माझ्या यशात माझं कुटुंब आणि माझ्या शाळेची भूमिका खूप महत्त्वाची असल्याचं रेश्माने सांगितलं. तर रेश्मा ज्या शाळेत शिकत होती, त्या शिवभक्त विद्यामंदिराचे तत्कालीन मुख्याध्यापक आणि सध्याचे कोकण शिक्षक मतदारसंघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे हे देखील रेश्माच्या विजयी मिरवणुकीत उत्साहाने सहभागी झाले. रेश्माचा अभिमान वाटत असल्याची प्रतिक्रिया त्यांनी दिली.

# कल्याण बाजार समितीची निवडणूक तत्काळ घ्या

## निवडणूक प्राधिकरणाचे आदेश



## मतदार याद्यांच्या विलंबाबद्दल उपनिबंधकांकडून मागितला खुलासा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणुकीची प्रारूप मतदार यादी तयार करून तातडीने निवडणूक घेण्याचे आदेश ६ जानेवारी रोजी ठाणे जिल्हा उपनिबंधकांना दिले होते. मात्र याबाबत काहीच हालचाल न करता उलट सभापती निवडणूक घेण्याचा 'पराक्रम' जिल्हा निबंधकांनी केला होता. याची गंभीर दखल राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने घेतली आहे. निवडणुकीची प्रारूप मतदार यादी का तयार केली नाही याचा तातडीने खुलासा ठाणे जिल्हा निबंधकांकडून निवडणूक प्राधिकरणाने मागितला आहे. यासोबतच प्रारूप मतदार यादी तयार करून तातडीने निवडणूक घेण्याचे फर्मानही बजावले आहे.कल्याण बाजार समितीच्या विद्यमान संचालक मंडळाचा कार्यकाळ मार्च २०२४मध्येच संपला होता. मात्र शासनाने सहा महिन्यांची मुदतवाढ दिली होती. त्यानंतर पुन्हा २२ ऑक्टोबर २०२४ ते २१ एप्रिल २०२५ अशी सहा महिने मुदतवाढ दिली. दरम्यान, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण पुणे यांनी जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात एक परिपत्रक काढले. यानुसार ६ जानेवारीपासून राज्यातील निवडणुकीस पात्र असणाऱ्या सर्व बाजार समितींची निवडणूक प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक यांना दिले होते.या आदेशानुसार कल्याण एपीएमसीच्या निवडणुकीसाठी प्रारूप मतदार यादी तयार करण्यासाठीचा अहर्ता दिनांक निश्चित करून मिळण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा उपनिबंधक यांनी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास सादर करणे आवश्यक होते. मात्र जिल्हा निबंधकांनी आजतागायत तो सादर केला नाही. याची गंभीर दखल निवडणूक प्राधिकरणाने घेतली असून कल्याण बाजार समितीची निवडणूक प्रक्रिया तातडीने सुरू करण्याचे आदेश जिल्हा उपनिबंधकांना बजावले आहेत.'निवडणूक अतितत्काळ' या मथळयाखाली कल्याण बाजार समितीची निवडणूक प्रक्रिया सुरू करण्याबाबत पत्र ठाणे जिल्हा उपनिबंधकांना धाडले आहे. यात प्राधिकरणाच्या आदेशाचे उल्लंघन केल्याबद्दल प्राधिकरणाचे सचिव अशोक गाडे यांनी जिल्हा उपनिबंधकांवर ताशेरे ओढले आहेत. प्रारूप मतदार यादी तयार करण्यास का विलंब झाला याचा खुलासा मागितला आहे. ठाणे जिल्हा उपनिबंधक यांनी आदेशाचे उल्लंघन केल्याची बाब पणनचे अपर मुख्य सचिव आणि पणन संचालक यांच्याही निदर्शनास आणून दिली आहे.

# कल्याण सार्वजनिक बांधकाम विभाग बनलाय भ्रष्ट कारभाराची बजबजपुरी ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

## ठेकेदारांची मुजोरी • अधिकाऱ्यांची टक्केवारी ?

कल्याण : कल्याण तालुका सार्वजनिक बांधकाम विभाग भ्रष्ट कारभारची बजबजपुरी झाला आहे. येथील तेच तेच ठेकेदार मालामाल होतं आहेत. अधिकारी टक्केवारीत मग्न आहेत. त्यामुळे या विभागाच्या आधीपत्याखाली होणारी कामे निकृष्ट दर्जाची होत आहेत. त्यामुळे करोडो रुपये खर्च होऊन ही विकासकामे मात्र कागदावर दिसत आहेत. कल्याण तालुका सार्वजनिक बांधकाम विभागा आंतर्गत कल्याण मधील न्यायालय, आधारवाडी कारागृह, ग्रामीण रुग्णालय, तसेच ग्रामीण व शहरी भागातील रस्त्याचा समावेश होत आहे.सार्वजनिक बांधकाम खात्याने मागील वर्षी स्वतःच्या आवरातील विश्रामगृह इमारत बांधकाम केले तब्बल 75 लाख रुपये खर्च करन बांधलेली इमारत एका वर्षातच दुरुस्तीला आली आहे. 75 लाख रुपये निधी खर्च केला कुठे? असा प्रश्न निर्माण होतो. याच विभागाआंतर्गत येणाऱ्या आधारवाडी जेल मधील काम सतत सुरु असते त्याबद्दल ही नागरिक शन्का निर्माण करतात. येथील तेच ठेकेदार तेच अधिकारी त्यामुळे बांधकाम विभागाच्या कारभारा पारदर्शक असणार तरी कसा. तीच स्थिती खड्डे भरणाऱ्या कामा बाबत एस आर चा खड्डे भरण्याची कामे म्हणजे तुम्ही पण खा आम्ही पण खाऊ याच धरतीची खड्डे न भरताचा बिले काढली जातात त्यामुळे रस्ते खड्डेमय आहेत तसेच असतात. हे चित्र निर्माण करण्यात सार्वजनिक बांधकाम विभाग च जबाबदार आहे. कल्याण चे सार्वजनिक बांधकाम विभाग म्हणजे ठेकेदारांचा अड्डा बनला आहे. येथील अधिकाऱ्यांची टक्केवारी आणि प्रत्यक्ष कामा कडे केले जाणारे दुर्लक्ष यामुळे हे कार्यालयात फक्त ठेकेदारांचाच वावर असतो.

> "सार्वजनिक विभागात ठेकेदारांचा वावर असतो असा आरोप आहे; मात्र त्यात तथ्य नाही, कोणत्याही ठेकेदारांना सार्वजनिक बांधकाम विभागाकडून वाव दिला जात नाही; रस्त्यांची कामे अतिशय उत्तम प्रकारे सुरू असून त्यात कोणताही भ्रष्ट वा गैरव्यवहार झालेला नाही, रस्त्याच्या कॉंक्रीटीकरणची कामे सुरू असून व्हिजिलन्स विभागाच्या अधिकाऱ्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून होत असलेल्या रस्त्यांची पाहणी केली आहे, जी काम पूर्ण झालेली आहेत केवळ त्यांची देयके होतात"
>
> – श्रीमती मोहरीकर
> उपअभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग कल्याण

# गीतासार



नेहाभिक्रमनाशोऽस्ति प्रत्यवायो न विद्यते ।
स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ॥२- ४०॥

या कर्मयोगात आरंभाचा अर्थात बीजाचा नाश नाही. आणि उलट फळरूपी दोषही नाही. इतकेच नव्हे तर, या कर्मयोगरूप धर्माचे थोडेसेही साधन जन्ममृत्युरूप मोठ्या भयापासून रक्षण करते. ॥ २-४० ॥

व्यवसायात्मिका बुद्धिरेकेह कुरुनन्दन ।
बहुशाखा ह्यनन्ताश्च बुद्धयोऽव्यवसायिनाम्
॥२- ४१॥

हे अर्जुना, या कर्मयोगात निश्चयात्मक बुद्धी एकच असते. परंतु अस्थिर विचार असणाऱ्या, अविचारी, कामनायुक्त माणसांच्या बुद्धी खात्रीने पुष्कळ फाटे फुटलेल्या व असंख्य असतात. ॥ २-४१ ॥

# हिमालयाची सावली : त्यागमूर्ती माता रमाई



आज ७ फेब्रुवारी, भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी रमाई यांची जयंती. ७ फेब्रुवारी १८९७ रोजी माता रमाई यांचा जन्म एका गरीब कुटूंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भिकू धोत्रे ( वलंगकर ) तर आईचे नाव रुक्मिणी असे होते. दाभोळजवळील वनंदगावात नदीकाठी महारपुरा वस्तीमध्ये त्या राहत होत्या. त्यांना तीन बहिणी व एक भाऊ होता. त्यांचे वडील दाभोळ बंदरात माशांनी भरलेल्या टोपल्या पोहचवत असत. रमाई लहान असतानाच त्यांच्या आईचे निधन झाले. काही दिवसांनी वडिलांचेही निधन झाले. लहान वयातच आई वडिलांचे छत्र हरपल्याने कोवळ्या रमाईच्या मनावर मोठा आघात झाला. आई वडिलांविना पोरक्या झालेल्या या भावंडांना वलंगकर काका व गोविंदपूरकर मामा यांनी मुंबईला आणले. मुंबईतील भायखळा मार्केटच्या चाळीत ते राहू लागले. त्याच सुमारास सुभेदार रामजी आंबेडकर हे आपल्या भीमरावसाठी मुलगी पाहत होते. वलंगकारांकडे लग्नाची मुलगी असल्याचे त्यांना समजले. सुभेदार रामजी आंबेडकर यांनी रमाईला पाहिले. रमाईला पाहता क्षणिच सुभेदाराने तिला आपल्या भीमरावासाठी पसंत केली. रमाई आणि भीमराव यांचा भायखळयाच्या मार्केटमध्ये विवाह झाला. विवाहाप्रसंगी बाबासाहेबांचे वय चौदा तर रमाईचे वय नऊ वर्ष होत. त्यावेळी बाल विवाहाची प्रथा समाजात रूढ होती. लग्नात पंच पक्वान्ने नव्हती. झगमग रोषणाई नव्हती. अतिशय साध्या पद्धतीने हा विवाह पार पडला. माता रमाईला जीवनात अनेक दुःखे सहन करावी लागली. १९२३ साली बाबासाहेब लंडनला गेले. त्यावेळी रमाईची खुप वाताहत झाली. ती दुष्काळाच्या आगीत होरपळत होती. बाबासाहेबांच्या कार्यकर्त्यांना त्यांचे हाल पहावले नाही त्यांनी काही पैसे जमा केले व ते पैसे रमाईला देऊ केले. त्यांनी कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर केला मात्र पैसे स्वीकारण्यास नम्रपणे नकार दिला. रमाई या बाबासाहेबांप्रमाणेच स्वाभिमानी होत्या. माता रमाई या आयुष्यभर दुःखाशी, गरीबीशी जिद्दीने झगडत होत्या मात्र हार मानत नव्हत्या. मृत्यूसत्र, दुःख, त्याग, समजूतदारपणा , कारुण्य, उदंड मानवता आणि मृत्यू यांचे सर्जनशील ज्वलंत प्रेरणास्थान म्हणजे माता रमाई. रमाईने अनेक दुःखे झेलली. त्यांच्या इतके मरण कोणीही पाहिले नसेल. लहान वयातच आई वडिलांचा मृत्यू, १९१३ साली सासरे शुभेदार रामजी आंबेडकर यांचा मृत्यू, बाबासाहेबांचे मोठे बंधू आनंदराव, त्यांचा मुलगा गंगाधर यांचा मृत्यू, १९२१ साली बाबासाहेबांचा मुलगा बाळ गंगाधर, १९२६ मध्ये राजरत्न असे अनेक मृत्यू त्यांनी पाहिले पण त्या डगमगल्या नाहीत. पती बाबासाहेब आंबेडकर परदेशात शिकायला गेल्यावर त्या एकट्या घर चालवत होत्या. घर चालवण्यासाठी तिने शेण गोवऱ्या वेचल्या. बॅरिस्टर पतीची पत्नी शेण गोवऱ्या गोळा करते असे लोक नावे ठेवतील म्हणून त्या पहाटे लवकर उठून शेण गोवऱ्या गोळा करत. आयुष्यभर काबाड कष्ट करून त्यांचे शरीर पोखरून गेले होते. त्यामुळे त्या आजारी पडल्या. जानेवारी १९३५ पासून आजार वाढत गेला. मे १९३५ ला त्यांचा आजार विकोपाला गेला. बाबासाहेबांनी सर्व नामांकित डॉक्टरांना पाचारण केले. मात्र त्यांचे शरीर औषधोपचारांना प्रतिसाद देत नव्हते. बाबासाहेब त्यांना फळांचा ज्यूस, चहा, कॉफी पाजत. मात्र त्यांच्या तब्येतीत सुधारणा होत नव्हती. अखेर २७ मे १९३५ रोजी रमाईची प्राणज्योत मावळली. सर्व परिसर आकांतात बुडाले. बाबासाहेबांना हे दुःख पचवणे अवघड गेले. ते रमाईच्या पार्थिवाशेजारी बसून ढसाढसा रडले. जवळ जवळ तीस वर्षे हिमालयासारख्या महामानवाला धैर्याने व प्रेमाने साथ देणारी हिमालयाची सावली सोडून गेल्याने बाबासाहेब एकाकी पडले. हिमालयाची सावली बनलेल्या त्यागमूर्ती माता रमाई यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

- श्याम ठाणेदार ,दौंड जिल्हा पुणे

# लोहमार्ग पोलिसांनी मोबाईल चोरटयांना केले जेरबंद

कल्याण : रेल्वेच्या हद्दीमध्ये मोबाईल चोरीच्या घटना घडत होत्या. या मोबाईल चोरीच्या घटनावर आळा घालण्यासाठी वरिष्ठांच्या सूचनेनुसार कल्याण लोहमार्ग पोलिस स्टेशन च्या गुन्हे शाखा युनिट-3, टीमने सापळा रचित पर राज्यातून आलेल्या तसेच सद्यस्थितीत दहिसर मोरी येथे राहणाऱ्या दोन आरोपींना कल्याणात ताब्यात घेत मोबाईल चोरीचे 23गुन्हे उघडकीस आणित तब्बल 46मोबाईल सुमारे किंमत 7 लाख 79 हजार 37रू. चा मुद्देमाल हस्तगत केला.



मिळालेल्या माहितीनुसार रेल्वे हद्दीत प्रवाशांच्या मोबाईल चोरीच्या वाढत्या घटना पाहता याला आळा बसण्यासाठी लोहमार्ग पोलिस आयुक्त रविंद्र शिसवे , पोलिस उप आयुक्त, मध्य परिमंडळ, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे, लोहमार्ग, मुंबई यांनी कल्याण लोहमार्ग पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विजय खेडकर, यांना सुचना दिल्या होत्या. त्यानुसार कल्याण रेल्वे गुन्हे युनिट येथील पोलीस उप निरीक्षक प्रकाश चौगुले व अंमलदार यांना मोबाईल फोन चोरी या सदराखाली गुन्हे करणाऱ्या आरोपींचा शोध घेण्याबाबत सुचना दिल्या होत्या.

त्यास अनुसरुन कल्याण युनिट मधील पोलीस अधिकारी व अंमलदार हद्दीत सतत गस्त करुन तसेच खबरीमार्फत आरोपीचा शोध घेत असतांना 30 जानेवारी 2025 रोजी रेल्वे हद्दीत मोबाईल फोन चोरी करणारे दोन इसम हे कल्याण पुर्व बाजुकडील यार्ड मार्गातुन कल्याण रेल्वे स्टेशन येथे येत असल्याबाबत खबर मिळाली. त्यानुसार याठिकाणी सापळा लाऊन चिन्ना व्यंकटेश पुसला, वय 32 वर्षे, राहणार कर्नाटक, अशोक हणमंता आवुला, वय 25 वर्षे, राहणार तेलंगणाचे असून सद्या दोघेही राहणार दहिसर मोरी, शिळफाटा, ता कल्याण जि ठाणे यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे केलेल्या प्राथमिक तपासात त्यांच्या कडून मोबाईल चोरीच्या 23 गुन्ह्यांची उकल करीत 46मोबाईल हस्तगत करीत जेरबंद केले.

# मुरबाडमध्ये भव्य धर्म महोत्सव

## ज्ञानोबा तुकोबाच्या जयघोषाने मुरबाड नगरी दुमदुमणार !





मुरबाड : परमपूज्य गुरुवर्य वेदमूती श्रीराम गजानन जोशी दादा यांनी अथक परिश्रम घेत स्थापन केलेल्या मुरबाड धर्म महोत्सवाचे यंदाचे २७वे वर्ष असून सदर धर्म महोत्सवाचा शुभारंभ १३फेब्रुवारी रोजी हजारो वैष्णव जनांच्या उपस्थितीत संपन्न होत आहे. मुरबाड नगरातील अध्यात्मिक परंपरेचा मानदंड म्हणून या महोत्सवाकडे अत्यंत आदराने पाहिले जाते. मुरबाड तालुक्याच्या तसेच शेजारी असलेल्या कल्याण, शहापूर, अंबरनाथ तालुक्यातील भाविक भक्त या महोत्सवात सहभागी होतात.कृषी उत्पन्न बाजार समिती पटांगण मुरबाड येथे या महोत्सवाची जोरदार तयारी सुरू करण्यात आली आहे तसेच सर्व सांप्रदायिक भाविक आतूरतेने या महोत्सवाची वाट पाहत आहेत

इ.स.१९९८ साली वैदिक अनुष्ठान पद्धतीने महाराष्ट्रातील पहिले पारायण सद्गुरु श्रीराम दादांनी कृषी उत्पन्न बाजार समिती पटांगण मुरबाड येथे सुरू केले .वैष्णव भूषण महंत प्रमोद महाराज जगताप यांनी महाराष्ट्रातील अनेक नामवंत प्रबोधनकार यांना मुरबाडच्या मातीत आणून सातत्याने प्रबोधन करण्याचे कार्य केले .एक सुचारू व शुचिर्भूत प्रबोधनाची रौप्यमहोत्सवी परंपरा या धर्म महोत्सवाला आहे. महाराष्ट्राच्या वारकरी संप्रदायाला अभिप्रेत असणारी शेकडो आदर्श व्यक्तिमत्वे बालयोगी सदानंद महाराज तुंगारेश्वर, वै.सदानंद गुरुजी आळंदीकर आळंदी,वै.बाबामहाराज सातारकर ,पारायणाचार्य पुंडलिक महाराज वेळूकर,श्रीगुरु चैतन्य महाराज देगलूरकर, आचार्य द्वाराचार्य रामकृष्णदास महाराज लहवीतकर, रामायणाचार्य रामराव ढोक महाराज, धर्मगुरू अमृताश्रम महाराज जोशी, गोसेवक संजय महाराज पाचपोर,गाथा मंदिर उभारणारे पांडुरंग महाराज घुले ,आचार्य जगन्नाथ महाराज पवार , डॉ. यशवंत .पाटणे, डॉ.यशवंत पाठक अशा अनेक विद्वान रत्नांनी या धर्म महोत्सवात येऊन आपले मौलिक विवेक संपन्न ज्ञानविचार समाजाला दिले आहेत.

यावर्षीही उमेश महाराज बागडे, आचार्य अर्जुन महाराज साळुंखे, पराग महाराज चातुर्मासे यांची प्रवचने तर ज्ञानेश्वर महाराज राऊत , आचार्य अमृताश्रम स्वामी महाराज जोशी, ज्ञानेश्वर महाराज राऊत, ज्ञानेश्वर महाराज काकडे, गोरक्ष महाराज उदागे ,कृष्णा महाराज चवरे ,तुकाराम महाराज मुळीक, अशोक महाराज इदगे यांची कीर्तने आयोजित करण्यात आली आहेत .वैष्णवभूषण प्रमोद महाराज जगताप यांचे काल्याचे संकीर्तन होणार आहे य.पारायणाचे नेतृत्व महंत वैष्णव भूषण प्रमोद महाराज जगताप, ग्रंथराज ज्ञानेश्वरी कंठभूषण एकनाथ महाराज कोष्टी ,राजाराम महाराज घावट करणार आहेत. योगी फुलनाथ महाराज टाकेश्वर मठाधिपती,योगी गोपीनाथ महाराज संगमेश्वर मठाधिपती यांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलन होणार असून वारकरी संप्रदायातील अनेक मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभणार आहे राजकीय क्षेत्रातील भिवंडी लोकसभेचेखासदार सुरेश म्हात्रे ,मुरबाड विद्यमान आमदार किसनजी कथोरे , माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील ,माजी आमदार गोटीराम भाऊ पवार, या मान्यवरांना विशेष आमंत्रित करण्यात आले आहे

उत्कृष्ट नियोजन,नेटके संयोजन, सुंदर सजावट,कमालीची शिस्त, भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद,भव्य पालखी सोहळा व दीपोत्सव, पुरणपोळीचा विशेष प्रसाद, महाराष्ट्रातील व महाराष्ट्रा बाहेरील मान्यवरांची उपस्थिती, महाप्रसादाचा दररोज होणारा लाभ वारकरी आचारसंहितेचे पालन ही या धर्म महोत्सवाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत

या धर्ममहोत्सव यशस्वीतेसाठी श्री दत्त देवस्थान सासणे उत्तराधिकारी निलेश दादा जोशी, मुरबाड तालुका कुणबी समाज उन्नती मंडळाचे माजी अध्यक्ष व सल्लागार शांताराम बांगर , लक्ष्मण सरनिंगे , चंद्रकांत घाडगे, पंडित चौधरी, सुधीर तेलवणे, बाबाजी करकंडे ,सुनील गुरुजी मंडलिक, नंदकुमार कोंडलेकर, कैलास मनोरे , प्रसाद रोठे याच बरोबर संपूर्ण कार्यकारणी प्रचार प्रसार करण्यासाठी रात्रंदिवस मेहनत घेत आहे.

# शेतकऱ्यावर कोयत्याने हल्ला

कल्याण : कल्याण पश्चिमेतील लक्ष्मी मार्केट परिसरात बैलासाठी मक्याचा पाला घेण्यास आलेल्या शेतकऱ्यावर गुरुवारी पहाटे अज्ञाताने कोयत्याने वार करीत जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक प्रकार घडल्याने मार्केट परिसरात खळबळ उडाली.

मिळालेल्या सुत्राच्या माहिती नुसार सापर्डे गावाचे शेतकरी बारक्या राजाराम मढवी हे गुरुवारी पहाटे कल्याण स्टेशन नजीक असणाऱ्या लक्ष्मी मार्केट भाजी मार्केट मध्ये बैलासाठी मक्याचा पाला आणण्यासाठी गेले होते. अज्ञातांनी त्यांच्या वर कोयत्याने वार करीत गंभीर जखमी केले. या हल्ल्यात बारक्या गंभीर जखमी झाला. कोयत्याचे वार शरीराच्या सर्व अगांवर असून चेहऱ्यावर देखील वार असल्याने रक्तबंबाळ अवस्थेतील शेतकरी मढवी यांस कल्याणातील खाजगी रुग्णालयात उपारार्थ दाखल करण्यात आले असून उपचार सुरू आहेत.

या प्रकरणी महात्मा फुले पोलिस स्टेशनचे पोलीसांनी तपास सुरू केला असून प्राण घातक हल्ला का केला आणि कोणी केला हे तपासाअंती सामारे येईल.

# अल्पवयीन मुलीच्या हत्येप्रकरणी आरोपींवर कठोर कारवाई करणार

## - पोलीस उपायुक्त अतुल झेंडे

कल्याण : कल्याण पूर्वेतील चक्कीनाका भागातील एका अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करून तिची निर्घृण हत्या केल्याच्या प्रकरणातील आरोपींवर येत्या आठवडाभरात आरोपपत्र दाखल केले जाईल. हा खटला जलदगती न्यायालयात चालवून आरोपींना कठोरात कठोर शिक्षा होईल यादृष्टीने तपास पूर्ण करण्यात आला आहे, अशी माहिती कल्याण परिमंडळाचे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी माध्यमांना दिली.



अल्पवयीन मुलीच्या हत्येमधील आरोपी विशाल गवळी, पत्नी साक्षी तुरूंगात आहेत. नव्वद दिवस उलटून गेले तरी याप्रकरणाचे आरोपपत्र न्यायालयात दाखल न झाल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. याविषयी डीसीपी झेंडे यांनी सांगितले, या गुन्हे प्रकरणात तपासात कोणत्याही प्रकारच्या त्रृटी राहू नयेत याची काळजी घेतली गेली जात आहे. या गुन्ह्याचा परिपूर्ण तपास व्हावा यासाठी आम्ही प्रयत्न केले आहेत. आरोपींना तपासातील कोणत्याही त्रृटीचा गैरफायदा मिळू नये याची काटेकोर काळजी घेतली आहे.

यांप्रकरणा संदर्भात ज्येष्ठ सरकारी वकील अॅड. उज्वल निकम यांच्याशी चर्चा करण्यात येत आहे. आरोपपत्र दाखल करण्यासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पूर्तता करण्याची कार्यवाही सुरू आहे. या सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यावर येत्या आठवड्यात आरोपींवर न्यायालयात आरोपपत्र दाखल केले जाणार आहे. हा खटला जलदगती न्यायालयात विना विलंब चालविण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न सुरू आहेत. पीडित कुटुंबीयांना तीन तरूणांनी धमकविण्याचा प्रयत्न केल्याबद्दल तिघांना कोळसेवाडी पोलिसांनी अटक केली आहे. पीडित कुटुंबीयांना कोणाचाही त्रास होऊ नये म्हणून त्यांच्या घराबाहेर एक महिला, पुरूष पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे, अशी माहिती कल्याण परिमंडळ तीनचे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी दिली.

# दाभाड किरवली हद्दीत बिबटयाचा वावर

## वनविभागाकडुन जनजागृती सुरू

पडघा: भिवंडी तालुक्यातील पडघा वनपरिक्षेत्राच्या हद्दीत असलेल्या जानवळ लोनाड परिसरात एका बिबट्याला जेरबंद केल्याची घटना ताजी असतानाच दाभाड किरवली वनपरिक्षेत्रात राजरोसपणे बिबट्याचा वावर सुरू असल्याने नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण पसरले आहे.



कोट-पंधरा विस दिवसापासून बिबट्याचा वावर असल्याने बिबट्या ट्रॅक करण्याचे काम सुरू असुन नागरीकांनी काय करावे काय करू नये याबाबत वनविभागामार्फत गावागावात जनजागृती सुरु आहे.
- शैलेश देवरे, वनपरिक्षेत्र अधिकारी पडघा.

गेल्या पंधरा दिवसापासून भिवंडी तालुक्यातील दाभाड, किरवली वनपरिक्षेत्राच्या हद्दीत एका छोट्या बिबट्याच्या वावर असल्याचे दिसून आले असून ४ फेब्रुवारी सदर बिबट्या कॅमेरात कैद झाला आहे. सदर बिबट्याचा वावर असल्याच्या घटनेला वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी दुजोरा दिलाआहे. सदर बिबट्या आतापर्यंत किरवली वनपरिक्षेत्राच्या हद्दीतील कुशिवली, घोलबाव, कोरडेपाडा, लाट्याचा पाडा या ठिकाणी दिसुन आला आहे सदर बिबट्याने कुशिवली येथील एकनाथ भोईर या आदिवासी इसमाच्या दोन शेळ्या फस्त केल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात आले आहे तर ४ फेब्रुवारी रोजी हा बिबट्या कोरडे पाडा, लाटे पाडा रस्त्यावर एका ट्रक चालकाच्या मोबाईलच्या कॅमेरात कैद झाला आहे.

# जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांची मुंबई दर्शन सहल

शहापूर ग्रामिण : ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध माहिती व्हावी यासाठी जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी मुंबई दर्शन सहलीचे आयोजन करण्यात आले होते.

वासिंद केंद्रातर्गत असलेल्या सारमाळ (शिंगे पाडा), दहागांव (दुसरा पाडा ), मौजे पाली, खातिवली (बामनपाडा), दहागांव (देसलेपाडा), वासिंद (रायकरपाडा) या शाळेतील विद्यार्थ्यांना विविध माहिती व्हावी यासाठी मुंबई दर्शन सहल आयोजित करण्यात आला होती.





यामध्ये मुलांना आकाशगंगा, विविध ऐतिहासिक स्थले, प्राणी पक्षी यांची माहिती होण्यासाठी भायखळा येथील राणीची बाग, प्राणी संग्रहालय आदी ठिकाणी भेट देऊन विद्यार्थ्यांना बाहेरील ठिकाणची माहिती मिळावी यासाठी या शैक्षणिक सहलीचे आयोजन केले असल्याचे सारमाळ (शिंगेपाडा) शाळेचे मुख्याध्यापक अनिल पडवळ यांनी म्हटले.

# रेसिपी

## हार्ट राहील एकदम टकाटक

सकाळी उठल्यानंतर काही साध्या गोष्टी अंगवळणी पाडल्यास हृदयाचे आरोग्य सुधारू शकते आणि हृदयविकाराचा धोका कमी होतो. सकाळी योग्य दिनक्रम आणि चांगल्या सवयी लावून घेतल्यास फक्त हृदयाचे आरोग्यच सुधारत नाही, तर संपूर्ण शरीर सक्रिय राहते.

**ठराविक वेळेला उठा**

हार्ट हेल्दी ठेवण्यासाठी आपण सकाळी किती वाजता उठतो याचीही नोंद ठेवणे आवश्यक आहे. एक टाईम फिक्स करून रोज त्याच वेळेला उठलं पाहिजे.

**सकाळी उठताच कोमट पाणी प्या**

सकाळी उठल्यानंतर लगेच थंड पाणी न पिता कोमट पाणी पिणे हृदयासाठी फायदेशीर असते. रात्रीच्या झोपेमुळे शरीरातील रक्ताभिसरण थोडे मंदावते, त्यामुळे सकाळी कोमट पाणी प्यायल्याने रक्ताभिसरण सुधारते आणि हृदयावरील ताण कमी होतो.

**रोज 15 ते 30 मिनिटे योग, प्राणायाम, वॉक करा**

योग आणि प्राणायाम केल्याने हृदयाचे आरोग्य सुधारते. अनुलोम-विलोम, भस्त्रिका आणि कपालभाती प्राणायाम केल्यास रक्तदाब नियंत्रणात राहतो आणि हृदयाच्या रक्तपुरवठ्याला मदत होते. नियमित योगामुळे शरीरातील ऑक्सिजनचा पुरवठा वाढतो, तणाव कमी होतो आणि कोलेस्टेरॉल नियंत्रणात राहते.

**सकाळी सूर्यप्रकाश घेणे आणि चालण्याची सवय लावा**

सकाळच्या कोवळ्या सूर्यप्रकाशात बसल्याने शरीराला नैसर्गिकरित्या व्हिटॅमिन डी मिळते, जे हृदयाच्या आरोग्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. व्हिटॅमिन डीच्या कमतरतेमुळे हृदयविकाराचा धोका वाढतो.

**आरोग्यदायी नाश्ता करा आणि साखर टाळा**

काळचा नाश्ता हृदयासाठी खूप महत्त्वाचा असतो. फळे, नट्स, ओट्स, मोड आलेली कडधान्ये आणि संपूर्ण धान्ययुक्त पदार्थ नाश्त्यात घेतल्याने हृदय निरोगी राहते.

**कॅफीन टाळा,सकाळी तणावमुक्त राहा आणि ध्यान करा,भरपूर पाणी प्या आणि सकाळी गोड पेय टाळा**

# डोंबिवलीत मोफत आरोग्य शिबीर

डोंबिवली : महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार श्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून डोंबिवली शिवसेना शहर मध्यवर्ती शाखा आणि धर्मवीर रिक्षा टॅक्सी चालक-मालक सेना यांच्यातर्फे रिक्षा टॅक्सी चालकांसाठी भव्य मोफत तपासणी शिबिर डोंबिवली पश्चिम स्टेशन जवळ आयोजित केले होते. बुधवार दिनांक 5 फेब्रुवारी 2024 रोजी सकाळी अकरा वाजेपासून सायंकाळी चार वाजेपर्यंत या चालणाऱ्या मोफत आरोग्य शिबिरात नेत्र चिकित्सा आणि चष्मे वाटप, इसीजी काढणे, मोतीबिंदू तपासणी आणि ऑपरेशन करणे हाडातील कॅल्शियम तपासणे अशा अनेक प्रकारच्या रोगांवरती मोफत उपचार आणि चष्मे, औषध वाटप करण्यात आले. या मोफत आरोग्य शिबिराचा लाभ शहरातील अनेक रिक्षा-टॅक्सी चालकांनी घेतला आणि आयोजकांचे मनापासून आभार मानले आणि समाधान व्यक्त केले या कार्यक्रमात धर्मवीर रिक्षा टॅक्सी चालक सेना माननीय राजेश मोरे साहेब अध्यक्ष (आमदार.) माजी नगरसेवक संजय पावशे. संतोष चव्हाण सरचिटणीस प्रशांत चव्हाण कार्याध्यक्ष संभाजी राठोड उपाध्यक्ष वाघीलाल जाधव अंकुश रानडे या अनेकांच्या सहकार्याने हे आरोग्य शिखरे यशस्वीरित्या पार पडले.



# तळाशेत जिल्हा परिषद मतदार गटात भाजपाची मुसंडी

## प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाणांच्या उपस्थितीत शेकडो कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश

बोरघर : दक्षिण रायगड युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांच्या प्रयत्नाने तळाशेत जिल्हा परिषद मतदारसंघात उबाठाचे उप तालुकाप्रमुख श्री सुधीर म्हामुणकर,साई पंचायत समिती गण प्रमुख श्री. संतोष कळंबे यांच्या समवेत सौ.रसिका राजेंद्र कळंबे सरपंच ग्रुप ग्रामपंचायत पेण/तळे, श्री.नामदेव ताम्हणकर,उपसरपंच ग्रुप ग्राम पंचायत पेण /तळे,श्री. विजय पेणकर माजी उपसरपंच व सदस्य ग्रामपंचायत पेण/ तळे,संतोष कळंबे,ग्रामपंचायत सदस्य पेण/तळे,श्री.नयन पोटले सामाजिक कार्यकर्ते,श्री.दत्तारामजी वडेकर,माजी अध्यक्ष पेण गाव,श्री. गणेश वडेकर,युवानेते श्री.अनिल लाड,श्री.दत्ताराम सुतार,श्री.नारायण मांगले,श्री.सुरेश मांगले,श्री.लक्ष्मण दिवेकर,श्री.दिनेश वडेकर,श्री.सुनील भोसले,श्री.सुभाष कालप,श्री.रमेश जाधव,श्री.सचिन जाधव, श्री.मंगेश वडेकर,श्री.महादेव बंगाल,श्री.किशोर पोटले,श्री.केशव मोंडे,श्री.सचिन लाड,श्री.मधुकर म्हामुणकर,श्री.शैलेश म्हामुंकार,श्री.महादेव पेडणेकर, श्री. बापु पेडणेकर,श्री.राजेंद्र सकपाळ श्री.भोलानाथ खिडबिडे,श्री.हेमंत ईप्ते,श्री.सचिन काशीम ,श्री.मधुकर वडेकर,श्री.रामचंद्र पेणकर श्री. अनिल वाघरे,श्री.प्रकाश मोहे,श्री. संतोष कालप, श्री.अनिल पारधी,श्री. रवींद्र भावे यांच्यासमवेत शेकडो कार्यकर्त्यांनी प्रदेश कार्यकारी अध्यक्ष आ. रवींद्रजी चव्हाण साहेब,प्रदेश उपाध्यक्ष अतुलजी काळसेकर,आमदार प्रशांतदादा ठाकूर,लोकसभा प्रमुख सतीशजी धारप यांच्या शुभहस्ते त्याचप्रमाणे सहकार आघाडी मा.गिरीशजी तुळपुळे,श्रीवर्धन विधानसभा प्रमुख प्रशांतजी शिंदे,सरचिटणीस ऍड.महेशजी मोहिते,सरचिटणीस मा. बिपीनदादा म्हामुणकर,मा. वैकुंठशेठ पाटील,भाजप विभाग अध्यक्ष अरुण पेणकर, माणगांव तालुका अध्यक्ष गोविंदजी कासार व सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीमध्ये भारतीय जनता पक्षात जाहीर पक्षप्रवेश केला.

या पक्षप्रवेशामुळे साई पंचायत समिती गणामध्ये भाजपा निर्णायक भूमिकेमध्ये आली असून तळाशेत जिल्हा परिषद मतदार संघावर दिवसेंदिवस भाजपाची पकड मजबूत होत असल्याचे अधोरेखित झाले आहे.या मतदार संघामध्ये भाजपा युवानेते निलेश थोरे यांना आ.मा.रवींद्र चव्हाण यांनी विशेष जबाबदारी दिली असल्याचे समजत असून त्यांच्याच वरदहस्ताने भाजपा ग्रामीण भागात रुजत असल्याचे दिसत आहे.मा.रवींद्र चव्हाण साहेबांनी व आमदार प्रशांतदादा ठाकूर यांनी प्रवेशकर्त्यांचे पक्षात स्वागत करून पूर्ण ताकदिनीशी भागाचा विकास करणार असल्याचे वचन दिले आहे.

# नवी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीत गुजरातीतून बिल पावत्या




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता प्रतिनिधी**

नवी मुंबई: नवी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीतील धान्य व मसाला मार्केटमध्ये ग्राहकांना मिळणाऱ्या गुजराती बिलांविरोधात मराठी एकीकरण समितीने (महाराष्ट्र राज्य) आवाज उठवला असून, ही बिले मराठी भाषेत व्यापाऱ्यांनी न दिल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा एपीएमसी प्रशासनाला दिला आहे.

मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा आहे. त्यामुळे नवी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती अंतर्गत येणाऱ्या सर्व बाजारांमध्ये मराठी भाषेचा दैनंदिन व व्यावहारिक वापर करणे अनिवार्य असल्याचे समितीने निवेदनात म्हटले आहे. ग्राहकांना देण्यात येणारी कृषी मालाची बिले सुद्धा मराठी भाषेतच असावीत असा शासनाचा नियम असल्याचे समितीचे नवी मुंबई अध्यक्ष यागेश मोहन यांनी सांगितले.

याबाबत एपीएमसी प्रशासनाला या आधीही निवेदने दिली आहेत. मात्र यावर कार्यवाही होताना दिसत नाही. त्यामुळे यावर तत्काळ कार्यवाही करून मराठीत बिले दिली नाहीत तर मराठी एकीकरण समितीतर्फे तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, अशा इशारा यागेश मोहन यांनी दिला आहे.

# उल्हासनगरच्या प्रगतीचा आलेख उंचावण्याचे संकेत

## मनपा कारभार होणार ई - ऑफिस !



उल्हासनगर :शहराच्या विकासात्मक प्रकल्पांना गती देण्यासाठी आमदार कुमार आयलानी आणि महापालिका आयुक्त मनीषा आव्हाळे यांच्यात विशेष बैठक पार पडली. या बैठकीत शहरातील रस्त्यांचे काम, पाणी पुरवठा, नियमितीकरण प्रक्रिया, कचरा व्यवस्थापन, आणि उल्हासनगर महापालिकेच्या काही जागांचे व्यावसायिक रूपांतर यावर चर्चा झाली.

आमदार कुमार आयलानी यांनी नागरिकांच्या तक्रारींवर लक्ष केंद्रित करून शहरातील मूलभूत सुविधां मध्ये सुधारणा करण्यावर भर दिला. रहिवाशांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी नवीन सॉफ्टवेअर विकसित करण्यात येत असून, मार्चपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण होईल. शहरातील विविध भागांत सुरू असलेली रस्त्यांची कामे मार्चपर्यंत पूर्ण होतील. बेजबाबदार ठेकेदारांचे टेंडर रद्द करून कार्यक्षम ठेकेदारांना संधी दिली जाईल. १७ सेक्शन परिसरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी तातडीने पावले उचलली जातील. नागरिकांच्या तक्रारी सोडवण्यासाठी ऑनलाइन तक्रार नोंदणी प्रणाली सुरू करण्यात येत असून, ई-ऑफिस प्रणालीद्वारे त्यावर कार्यवाही केली जाईल. चांगल्या कामगिरीसाठी कर्मचाऱ्यांना बढती देण्याचा निर्णय घेतला जाईल. नव्या मनपा इमारतीचा वापर करण्यासाठी स्थानिक आर्किटेक्ट्सचा समावेश केला जाईल. या मुख्य मुद्द्यावार चर्चा करण्यात आली.

महापालिका आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी स्पष्ट केले की, मनपाच्या कामकाजात पारदर्शकता आणण्यासाठी आणि शहराच्या विकासाला वेग देण्यासाठी ठोस निर्णय घेतले जातील. ई-ऑफिस प्रणालीमुळे नागरिक तक्रारींचे स्टेटस ट्रॅक करू शकतील. पाणीपुरवठा, ड्रेनेज, आणि नियमितीकरणासंबंधी विशेष पथक स्थापन करून मार्च अखेर सर्व प्रक्रिया पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

शहरातील मुख्य रस्त्यांचे आणि एमएमआरडीएच्या सात रस्त्यांचे काम वेगाने सुरू करण्यात येणार आहे. बेजबाबदार पद्धतीने काम करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल, तर चांगली कामगिरी करणाऱ्या अधिकाऱ्यांना बढती देण्यात येईल. आमदार कुमार आयलानी यांनी मुख्यमंत्र्यांकडे मनपातील रिक्त पदे भरून विकास कामांना गती देण्याची मागणी करणार असल्याचे सांगितले.

# थकीत मालमत्ता कर वसुलीसाठी

## भिवंडी पालिकेची चौथ्या टप्प्यातील अभय योजना

भिवंडी:भिवंडी महानगरपालिका क्षेत्रातील थकीत मालमत्ता कराचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळेच थकीत मालमत्ता कर वसुली साठी पालिकेकडून आर्थिक वर्षाच्या शेवटच्या टप्प्यात पुन्हा एकदा चौथ्या टप्प्यातील अभय योजनेची घोषणा महानगरपालिका प्रशासक तथा आयुक्त श्री अजय वैद्य यांनी केली आहे. या अभय योजना कालावधीत १५ फेब्रुवारी पर्यंत थकीत मालमत्ता करावरील व्याजावर १०० टक्के सूट देण्यात येणार आहे. या १००% व्याज माफीचा कालावधी केवळ पुढील ९ च दिवस आहे. त्यानंतर १६ ते २ मार्च पर्यंत ७५ टक्के व्याजमाफी दिली जाणार आहे, तर ३ ते ३१ मार्च पर्यंत च्या शेवटच्या टप्प्यात ५० टक्के व्याज माफी मिळणार आहे. तरी शहर विकासासाठी आणि अभय योजनेचा लाभ घेण्यासाठी मालमत्ताधारकांनी आपल्या थकीत मालमत्ता कराचा भरणा करून व्याज माफी मिळवून शहर विकासासाठी हातभार लावावा असे आवाहन प्रशासक तथा आयुक्त अजय वैद्य यांनी केले आहे.

# पोलीस पाटीलांना हवे सायबर प्रशिक्षण

## बाळासाहेब पाटील - पो. अधिक्षक पालघर



पालघर : सायबर गुन्हेगार जनतेला अनेक प्रकारचे लालच दाखवून फोन करीत आहेत. व सर्वसामान्य नागरिक त्याला बळी पडत आहे. या अनुषंगाने पालघर जिल्ह्यातील नागरिक, सायबर गुन्ह्याना बळी पडू नये. व सायबर साक्षरता निर्माण करण्यासाठी मा. श्री. बाळासाहेब पाटील - पो. अधिक्षक पालघर यांच्या संकल्पनेतून सायबर सुरक्षित पालघर मोहीम राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने दिनांक ४ फेब्रुवारी २०२५ रोजी, नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय पालघर येथे, विनायक नरळे - अप्पर पो. अधिक्षक यांच्या अध्यक्षतेखाली. सायबर सुरक्षित पालघर, कार्यक्रमा अंतर्गत. सायबर योध्दाना प्रशिक्षण देण्यासाठी कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला. या प्रशिक्षणासाठी पालघर जिल्ह्यातील अंदाजे २०० पोलीस पाटील यांनी सहभाग घेतला. यामध्ये महिला पोलीस पाटील यांची संख्या उल्लेखनीय होती. प्रशिक्षण घेत असलेल्या या सायबर योध्दाना. आवश्यक विषयावर, सायबर गुन्ह्यांची ओळख, सायबर गुन्ह्यांची पध्दत, सायबर गुन्हे घडल्यानंतर, पहिल्या एका तासात ( गोल्डन अवर ) करावयाची कामगिरी, नॅशनल सायबर क्राईम पोर्टल वर तक्रार कशी नोंद करावी. मोबाईल हरवल्यानंतर सी ई आय आर पोर्टल कशी नोंदवावी. याबद्दल सविस्तर माहिती देण्यात येऊन, सायबर सुरक्षा सबंधित व्हिडिओ क्लिप दाखविण्यात आली. तसेच सर्वसामान्य नागरिकांना सायबर गुन्हा घडल्यास, कशा प्रकारे मदत करावी. याबद्दल सविस्तर माहिती सायबर योध्दाना देण्यात आली आहे.

मा. श्री. बाळासाहेब पाटील - पो. अधिक्षक पालघर, श्री. विनायक नरळे - अप्पर पो. अधिक्षक, पालघर. श्रीम. संगीत शिंदे - अल्फान्सो पो. अधिक्षक-गृह, यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीम. भागीरथी पवार- परि. पो. उपाध्यक्ष, प्रभारी पोलीस अधिकारी श्री. अजय गोरड पो. निरीक्षक. सहा. पो. नि. मंजुषा शिरसाठ, आर्थिक गुन्हे शाखा पो. उप. नि. रूपाली गुंड, सायबर पो. ठाणे - पो. उप. नि. मंगेश मुंडे, जि. वी. शा. - पो. उप. नि. पुनम सुर्यवंशी, आर्थिक गुन्हे शाखा- मपोनि कविता पाटील, मपोशि- मोनिका तिडके, पो. अं- अक्षय शेट्ये / रूपेश पाटील / रोहित तोरस्कर, व इतर अंमलदार यांनी कार्यक्रम यशस्वी नियोजन करीत पार पाडला.

# तिसरीच्या विद्यार्थ्यांना शिकवतात अंगणवाडी शिक्षिका

## मुंबईतील शाळेतील अनागोंदीवर पालकांचा संताप

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

मुंबई : घाटकोपर येथील पंतनगर महानगरपालिका उच्च प्राथमिक हिंदी शाळेत इयत्ता पहिले ते पाचवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी केवळ दोन शिक्षिका अध्यापन करीत आहेत. त्यापैकी पहिली ते तिसरीच्या विद्यार्थ्यांसाठी तरअंगणवाडी शिक्षिकेची नेमणूक करण्यात आली आहे. अध्यापनासाठी शैक्षणिक पात्रता पूर्ण नसतानाही या शिक्षिकेची नेमणूक केल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसान होत आहे. पुरेसे व नियमित शिक्षक नसल्याने पालकांकडूनही संताप व्यक्त केला जात आहे. पालिकेतील अनके शिक्षक प्रतिनियुक्तीवर अन्य कार्यालयात काम करीत आहेत. मात्र, यामुळे विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी पालिकेच्या शाळेत शिक्षकांची संख्या अपुरी आहे.

पालिकेच्या शिक्षण विभागामार्फत शाळेचा दर्जा आणि शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी विविध उपाययोजना व उपक्रम राबविले जातात. मात्र, घाटकोपरमधील पंतनगर शाळेत गेल्या अनेक महिन्यांपासून पुरेशा आणि नियमित शिक्षकांअभावी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा खेळखंडोबा झाला आहे. आरटीई नियमानुसार इयत्ता पहिली ते पाचवीच्या वर्गात प्रत्येक २५ विद्यार्थ्यांमागे १ शिक्षक असणे अनिवार्य असते. मात्र, पंतनगर शाळेत इयत्ता पहिली ते पाचवीमध्ये शिक्षण घेत असलेल्या एकूण ९७ विद्यार्थ्यांच्या अध्यापनासाठी शिक्षक नसल्याचे निदर्शनास आले आहे. अध्यापनासाठी शाळेत पुरेसे शिक्षक नसल्याने विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती खुंटण्याची शक्यता आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून शिक्षकांच्या नेमणुकीबाबत शाळेने पालिकेच्या शिक्षण विभागाकडे पत्रव्यवहार केला आहे.

मात्र, अद्यापही शाळेत शिक्षकांची संख्या अपुरी आहे. गतवर्षी संबंधित शाळेत पहिली ते पाचवीसाठी ३ शिक्षक अध्यापन करत होते. त्यातील एका शिक्षिकेने स्वेच्छेने सेवानिवृत्ती घेण्याचा निर्णय घेतला असून जुलै २०२४ मध्येच त्याबाबत पालिकेच्या शिक्षण विभागाकडे अर्ज सादर केला आहे.

> शाळेत अध्यापनासाठी पुरेसे शिक्षक आहेत. मात्र, पहिली ते तिसरीच्या विद्यार्थ्यांना अंगणवाडी शिक्षिकेकडून अध्यापन केले जाते, याबाबत काहीही माहिती नाही. तसेच, शिक्षक उपलब्ध नसल्यास शाळेत कंत्राटी पद्धतीवर शिक्षकांची नेमणूक करण्याचे अधिकार मुख्याध्यापिकांना देण्यात आले आहेत.
>
> ○ वीणा सोनवणे प्रशासकीय अधिकारी, एन विभाग

मात्र, पालिकेने त्या शिक्षिकेचा अर्ज मंजूर केला नसल्याने संबंधित शिक्षिका अनेकदा शाळेत अनुपस्थित असते. दुसरी शिक्षिका २१ जानेवारीपासून बालसंगोपन रजेवर गेली आहे. त्यामुळे केवळ एकच शिक्षिका इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना अध्यापन करीत होती. मात्र, गेल्या काही दिवसांपासून पहिली ते तिसरीच्या विद्यार्थ्यांना चक्क अंगणवाडी शिक्षिका अध्यापन करीत आहे. एकाच वर्गात अंगणवाडी आणि पहिली ते तिसरीचे वर्ग भरविले जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांना अध्यापनात अडचणींचा सामना करावा लागत आहे. तसेच, इयत्ता पहिली ते तिसरीपर्यंतच्या अध्यापनासाठी शैक्षणिक अहर्ता नसतानाही अंगणवाडी शिक्षकेची नेमणूक केल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर नकारात्मक परिणाम होत असल्याची खंत पालकांकडून व्यक्त केली जात आहे.

शिक्षकांची कमतरता, शिक्षणाचा ढासळलेला दर्जा, प्रशासनाची अनास्था आदींमुळे शाळेतील पटसंख्येलाही गळती लागली आहे. तसेच, शाळेत एकही शिपाई नसल्याने अन्य कामांचाही खोळंबा होत आहे. याबाबत शाळेच्या मुख्याध्यापिकेंशी बोलण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी बोलण्यास नकार दिला.गेले अनेक महिने शिक्षकांच्या नेमणुकीबाबत शाळेने शिक्षण विभागाकडे पत्रव्यवहार केला आहे. मात्र, अद्यापही शाळेत शिक्षकांची संख्या अपुरी आहे.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://x.com/@Jeevandeepvarta
https://www.facebook.com/jeevandeepnews
https://www.instagram.com/thane_jeevandeep
https://jeevandeepvarta.com

# ज्ञान वाढीसाठी विद्यार्थ्यांनी वाचन करावे

## – उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे

पेण: युवा पिढीमध्ये वाचन संस्कृती वाढीस लागली पाहिजे. वाचनातून प्रगल्भता येते. विविध विषयांतील माहिती व ज्ञान मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांनी आपली वाचनकक्षा रुंदवावी, असे आवाहन विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ नीलम गोऱ्हे यांनी केले. उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे ग्रंथालय संचालनालय, मुंबई शहरचे जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय आणि मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय यांच्या संयुक्त विद्यमाने दादर येथे आयोजित मुंबई शहर ग्रंथोत्सव २०२४ ' कार्यक्रमात डॉ. गोऱ्हे बोलत होत्या. यावेळी उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत आणि डॉ गोऱ्हे यांच्या हस्ते फीत कापून ग्रंथोत्सवाचे उद्घाटन झाले.

प्रभारी ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, जिल्हा ग्रंथालय अधिकारी शशिकांत काकड, साहित्यिक व ज्येष्ठ पत्रकार श्रीकांत बोजेवार, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या कार्याध्यक्ष पत्रकार शीतल करदेकर, कार्यवाह रवींद्र गावडे आदींसह विद्यार्थी उपस्थित होते. उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे म्हणाल्या की, प्रत्येकाला मनासारखे वाचता येण्यासाठी स्वातंत्र्य हवे. मात्र काय वाचावे आणि काय बघावे यावर मुला-मुलींनी नियंत्रण ठेवावे. केवळ मोबाईलवर गुंतून न राहता रोज काहीतरी वाचन करावे, तरच लेखनामध्ये प्रगती होते. दुसऱ्याचे ऐकून घ्यायला शिकले पाहिजे. समाजमाध्यमावर व्यक्त होताना कायद्याच्या चौकटीत राहून लिहिण्याचा प्रयत्न करा नवीन लेखक तयार होत आहेत चांगल्या लेखनाचा अनुभव घ्या, असेही डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय आणि इमारत दुरुस्ती पुनर्विकासासाठी निधीचा प्रस्ताव पाठवण्याबाबतही डॉ गोऱ्हे यांनी सूचना केल्या.

शालेय जीवनातच मुलांना राष्ट्रपुरुष समजावेत यासाठी साहित्य संमेलने – मंत्री उदय सामंत

ग्रंथालयाकडे युवकांचा ओढा वाढविण्यासाठी ग्रंथ चळवळीने प्रयत्न करावेत. शालेय जीवनातच मुलांना राष्ट्रपुरुष समजण्यासाठी बाल, युवा आणि महिला साहित्य संमेलन यावर्षी राज्य शासनामार्फत घेण्यात येणार असल्याची माहिती मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी दिली. मोबाईलबरोबर पुस्तक ऐकण्याची सुविधा आहे त्याचाही विद्यार्थ्यांनी स्वीकार करावा. मराठी संस्कृती जोपासण्यासाठी पुस्तके वाचून आत्मचिंतन करा. महाराष्ट्राची संस्कृती कशी घडली हे वाचा, ग्रंथ आणि ग्रंथालयाबद्दल अभिमान बाळगा. जिल्हा ग्रंथालयाने ग्रंथोत्सव भरविताना तो अधिक व्यापक स्वरुपात होईल असे नियोजन करावे, असेही श्री. सामंत यांनी सांगितले. इंग्रजी आणि हिंदी यायलाच हवे, मात्र मराठीचा विसर पडू नये. मराठी भाषेकडे आदराने बघावे, विश्व मराठी संमेलनामध्ये पुस्तक आदानप्रदानाचा उपक्रम घेण्यात आला. तो उपक्रम प्रत्येक ग्रंथालयाने राबवायला हवा अशी अपेक्षा व्यक्त करून सर्व ग्रंथालय डिजिटल करण्यावर भर देण्यात येत असून यासाठी निधीची कमतरता भासणार नाही, असे श्री. सामंत यांनी सांगितले. रत्नागिरीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय ग्रंथालय आणि रिसर्च सेंटर उभारणार असून रायगड जिल्ह्यातील गावात ही शिवाजी महाराजांचा वैशिष्ट्यपूर्ण पुतळा उभा करण्यात येणार आहे. अशा उपक्रमांमुळे पर्यटन विकास वाढीला चालना मिळेल, असेही श्री. सामंत यांनी सांगितले. प्रास्ताविकात श्री गाडेकर यांनी वाचन संस्कृतीच्या विकासासाठी ग्रंथालय संचालनालय कटिबद्ध असल्याचे सांगितले. आभार रवींद्र गावडे यांनी मानले तर सूत्रसंचालन अमेय रानडे यांनी केले. तत्पूर्वी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, नायगाव, दादर (पू.) मनपा अग्निशमन केंद्र, दादर-रणजित बुधकर चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, निरंकारी बाबा हरदेव सिंहजी महाराज चौक, एस. एस. वाघ मार्ग-महात्मा गांधी चौक- महात्मा फुले रोड - शाहीर मधू कडू चौक या मार्गावरुन लेझिम आणि ढोलताशांच्या गजरात ग्रंथदिंडी काढण्यात आली.

# कल्याण ग्रामीणचा पाणी प्रश्न तात्काळ सोडवा

## – आमदार राजेश मोरे



**त्रुटी बाबत उद्योग मंत्र्यांशी चर्चा करण्याचे आमदार राजेश मोरे यांचे एम आयडीसीच्या अधिकाऱ्यांना आश्वासन**

कल्याण : कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघातील पाणी प्रश्नाबाबत आमदार राजेश मोरे यांनी डोंबिवली शहर सचिव आणि विधानसभा क्षेत्रप्रमुख संतोष चव्हाण, सतीश मोडक, निलेश शहा यांच्या समवेत एमआयडीसीच्या अधिकार्यांची भेट घेतली.

आमदार झाल्यापासून मागील दोन महिन्यात पाण्याबाबत आमदार मोरे यांनी घेतलेली ही चौथी बैठक आहे. दरम्यान या भागातील नागरिकांना पिण्यासाठी त्यांच्या हक्काचे पाणी मिळालेच पाहिजे त्याचबरोबर वाढत्या लोक्संख्येसाठी वाढीव कोटा मिळण्याबाबत ज्या ज्या त्रुटी असतील त्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मंत्री उदय सामंत यांच्याशी चर्चा करून तातडीने सोडविले जातील. मात्र अमृत योजनेच्या कामाचा वेग वाढवा, तसेच ग्रामीण भागासाठी मंजूर असलेल्या कोट्यातून सर्व पाण्या त्या भागासाठी सोडण्याचे नियोजन करा यासारख्या सूचना आमदार मोरे यांनी एम आयडीसीच्या अधिकाऱ्यांना दिल्या. अधिकार्यांनी ग्रामीण भागातील पाण्याच्या नियोजनाचा भविष्यातील प्लान सादर केला. यावेळी कार्यकारी अभियंता दिलीप आव्हाड महापालिकेचे पाणी पुरवठा विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघात पाणी प्रश्न भेडसावत असून या नागरिकांना पिण्याचे पाणी मिळावे यासाठी एमआयडीसी अधिकार्याशी चर्चा करण्या बरोबरच पहिल्या नागपूर अधिवेशनात देखील आमदार मोरे यांनी या भागासाठी वाढीव पाणी कोटा मंजूर करून देण्याची मागणी केली आहे. आज पुन्हा एम आयडीसी अधिकार्याची भेट घेत त्यांनी या भागाचा पाणी प्रश्न सोडविण्यासाठी एमआयडीसीने केलेल्या नियोजन आराखड्याची आमदार मोरे यांनी पाहणी केली. यानंतर या नियोजनाच्या अमलबजावणीत येणाऱ्या त्रुटी दूर करण्यासाठी सर्व प्रकारची मदत करण्याचे आश्वासन देतानाच नागरिकांना पिण्यासाठी मुबलक पाणी लवकरात लवकर लवकर उपलब्ध करून देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

तर याबाबत आजच मंत्री सामंत यांच्याशी देखील चर्चा करणार असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान नागरिकाना पाणी मिळणे हा त्यांचा मुलभूत अधिकार असल्याने हा प्रश्न सातत्याने पाठपुरावा करून मार्गी लावण्याचा आपला प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

# आतधोकादायक इमारतींना ठाणे मनपाच्या नोटीसा

ठाणे : पावसाळा सुरू होण्याच्या चार महिने आधीपासूनच ठाणे महापालिकेने विशेष खबरदारी घेत शहरातील धोकादायक इमारती रिकाम्या करण्यासाठी पाऊले उचलली असून यासाठी शहरातील ९६ अतिधोकादायकपैकी नागरिक राहत असलेल्या २६ अतिधोकादायक इमारतींना पालिकेने नोटीस बजावण्यास सुरूवात केली आहे. या नोटीसद्वारे सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून इमारत रिकामी करण्याची सुचना केली आहे. ठाणे महापालिका क्षेत्रात पावसाळयाच्या कालावधीत बेकायदा इमारती कोसळून जिवितहानी होण्याचे प्रकार घडले आहेत. असे प्रकार टाळण्यासाठी पालिकेने जुन्या इमारतींना बांधकाम संरचनात्मक परिक्षण करण्याची सुचना केली होती आणि त्यासाठी संबंधित कंपन्यांची यादीही पालिकेने संकेतस्थळावर प्रसिद्ध केली होती. या अहवालानुसार पालिकेकडून शहरातील धोकायदायक




इमारतींची पालिकेकडून सी-१, सी-२ ए , सी २ बी आणि सी ३ अशा चार टप्प्यांत वर्गीकरण करण्यात येते. यानुसार संपुर्ण पालिका क्षेत्रात ४ हजार ४०७ धोकादायक इमारती असून त्यात ९६ अतिधोकादायक इमारती आहेत. सर्वाधिक ४७ अतिधोकादायक इमारती नौपाडा परिसरात आहेत तर, त्याखालोखाल १६ अतिधोकादायक इमारती कोपरी परिसरात आहेत. यामुळे या दोन्ही विभागातच ६३ अतिधोकादायक इमारती आहेत. या इमारती पावसाळयात कोसळून जिवितहानी होण्याची शक्यता असते. यामुळे या इमारती पालिकेकडून रिकाम्या करून त्यांचे बांधकाम निष्काषित केले जाते. परंतु काही ठिकाणी रहिवाशी इमारत रिकामी करण्यास तयार होत नाहीत. त्यामुळे अशा रहिवाशांना पालिका पावसाळयाच्या पंधरा दिवस आधी नोटीस बजावून इमारत रिकामी करण्याची सुचना देते. यंदा मात्र पालिकेने चार महिने आधीपासूनच अशा इमारतींना नोटीस बजावण्यास सुरुवात केली आहे. ठाणे महापालिका क्षेत्रात एकूण ९६ अतिधोकादायक इमारती आहेत. त्यापैकी ३६ इमारती रिकाम्या करण्यात पालिकेला यश आलेले आहे. याव्यतिरिक्त १४ इमारतींची बांधकामे पालिकेने तोडली आहेत. तर, १० इमारतींची बांधकामे तोडणे बाकी आहे. ७ बांधकामे बैठ्या घरांच्या स्वरुपाची आहेत. ३ प्रकरणात दोन बांधकाम संरचनात्मक अहवाल भिन्न आले आहेत. तर, २६ इमारतीत आजही रहिवाशी राहत आहेत. या एकूण ९६ अतिधोकादायक इमारतींमध्ये ५४६ कुटूंबाची घरे तर, १५१ जणांची दुकाने आहेत. ठाणे महापालिका क्षेत्रातील धोकादायक इमारतींचे सी-१, सी-२ ए, सी-२बी आणि सी-३ अशा चार टप्प्यांत वर्गीकरण केले आहे. सी-१ म्हणजे राहण्यास अयोग्य आणि तात्काळ निष्कासित करावी लागणारी अतिधोकादायक इमारत, सी-२ ए म्हणजे इमारत रिकामी करून संरचनात्मक दुरुस्ती करणे, सी-२ बी म्हणजे इमारत रिकामी न करता त्याची संरचनात्मक दुरुस्ती करणे आणि सी-३ म्हणजे इमारतींची किरकोळ दुरुस्ती करणे. त्यामुळे सी-२ बी आणि सी-३ च्या यादीत ४ हजार १९ धोकादायक इमारती असल्या तरी त्याठिकाणी रहिवास वापर सुरूच राहणार आहे.

# थकबाकी रक्कमेपोटी केडीएमसीच्या ग प्रभागात मालमत्ता सिल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : डोंबिवली (पूर्व) ग प्रभाग क्षेत्रातील निवासी मालमत्ता व बिगर निवासी मालमत्तांना वारंवार नोटीस देवूनसुध्दा मालमत्ता कराचा भरणा करीत नसल्यामुळे कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड यांच्या निर्देशानुसार आणि कर निर्धारण व संकलन विभागाच्या स्वाती देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली ग प्रभागाचे सहा.आयुक्त संजयकुमार कुमावत, अधिक्षक ज्ञानेश्वर



कंखरे, वरिष्ठ लिपिक नरेश म्हात्रे, लिपिक रामचंद्र दळवी यांनी थकबाकी पोटी असलेल्या मालमत्ता सिल करण्याची धडक कारवाई आज दिवसभरात केली.
यामध्ये डोंबिवली (पूर्व) पांडुरंगवाडी येथील गणेश सिध्दी इमारतीमधील ब्लॉक नं.301 व 401 हे रक्कम रु.2 लाख 41 हजार 691 थकबाकीपोटी सिल करण्यात आले.
तसेच डोंबिवली (पूर्व) ओम शिवगणेश सोसायटी मधील विकासक पी.एस. म्हात्रे यांच्या रक्कम रु. 26 लाख 31 हजार 705 इतक्या थकबाकी पोटी ऑफिस सिल करण्यात आले.

# आरोग्य सर्वेक्षणाला सहकार्य करा

## रायगड जिल्हा प्रशासनाचे आवाहन

रायगड : रायगड जिल्ह्यात सर्वेक्षणाकरीता घरी येणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून कुटुंबनिवडीची प्रक्रिया, सर्वेक्षणाची महत्त्वाची माहिती समजून घेण्याची आणि आरोग्य विषयक खर्चासंबंधी योग्य व परिपूर्ण माहिती देण्यासाठी सर्व संबंधित कुटुंबियांनी पूर्ण सहकार्य करावे, असे आवाहन उपसंचालक, जिल्हा सांख्यिकी कार्यालय,रायगड वृषाली माकर यांनी केले आहे.

भारत सरकारच्या अधिपत्याखालील राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या धर्तीवर कुटुंबांचा आरोग्यविषयक होणारा खर्च या विषयावर राष्ट्रीय पातळीवर होणाऱ्या पाहणीत राज्यात अर्थ व सांख्यिकी संचालनालय सहभागी होत आहे. या पाहणीमध्ये जानेवारी 2025 ते डिसेंबर 2025 ह्या कालावधीत माहिती गोळा करण्यात येणार आहे. निवड झालेल्या कुटुंबांकडून मागील 365 दिवसांमध्ये कुटुंबाच्या आरोग्यविषयक होणाऱ्या खर्चाबाबत विस्तृत माहिती गोळा करण्यात येत आहे. पाहणीचे निष्कर्ष आरोग्य सेवा क्षेत्रात सुधारणा तसेच केंद्र व राज्य शासनाला नियोजनासाठी व धोरणे राबविण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.

ही पाहणी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये होणार असून या सर्वेक्षणाचा मुख्य उद्देश म्हणजे शासकीय आणि खाजगी रुग्णालय/दवाखान्यातून मिळणाऱ्या उपचारांवर होणारा खर्च, कुटुंबांचा आरोग्यविषयक होणारा खर्च, सर्व वयोगटातील लसीकरण, गर्भवती महिलांना मिळणाऱ्या सुविधांचा तपशील इत्यादी बाबींची माहिती गोळा करणे हा आहे. या सर्वेक्षणाअंतर्गत कुटुंबाची निवड एक वर्ष किंवा एक वर्षापेक्षा कमी वयाचे मूल असणारे कुटुंब आणि 'मागील 365 दिवसांमध्ये रुग्णालयामध्ये दाखल असणारी कुटुंबातील व्यक्ती यामधून करण्यात येणार आहे. या सर्वेक्षणाच्या निष्कर्षांचा उपयोग आरोग्य सेवा क्षेत्रात सुधारणा आणि सरकारच्या धोरणात्मक निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी होतो. राष्ट्रीय तसेच राज्यपातळीवर प्रभावी निर्णय घेणे शक्य व्हावे यासाठी सर्वेक्षणाच्या माहितीची सत्यता व गुणवत्ता अत्यंत महत्वाची आहे.

त्याअनुषंगाने माहिती संकलित करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना सखोल प्रशिक्षण देण्यासाठी कार्यशाळेचेआयोजन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे दि.07 जानेवारी 2025 ते 10 जानेवारी 2025 याकालावधीमध्ये करण्यात आले आहे. या कार्यशाळेच्या माध्यमातून क्षेत्रीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करण्यात येणार आहे. कार्यशाळेत प्रशिक्षण घेतलेले कर्मचारी फेब्रुवारी 2025 ते डिसेंबर 2025 दरम्यान निवडलेल्या कुटुंबांच्या घरी प्रत्यक्षभेट देऊन विहित नमुन्यातील माहिती गोळा करतील. नमूना तत्वावर निवडण्यात आलेल्या घटकातील कुटुंबाकडून प्राप्त माहितीवर आधारित निष्कर्ष हे राज्यातील लोकसंख्येकरिता अंदाजित केले जातील.

# दुर्गाडीनंतर मलंगगडाचा लढा

## १२ फेब्रुवारी रोजी मलंगगडावर पालखी सोहळ्याचे आयोजन

## - जिल्हा प्रमुख गोपाळ लांडगे

कल्याण : कल्याण मधील दुर्गाडी किल्ल्याचा लढा जिंकल्यावर आता श्री मलंगगड लढा हि जिंकणार असा विश्वास शिवसेना जिल्हा प्रमुख गोपाळ लांडगे यांनी व्यक्त केला आहे.
प्रतिवर्षी प्रमाणे या वर्षी देखील श्री मलंगगड पालखी सोहळा 12फेब्रुवारी पासून सुरु होत असून याची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत गोपाळ लांडगे बोलत होते. यावेळी शिवसेना उपनेत्या विजया पोटे, महिला जिल्हा प्रमुख लता पाटील, शहरप्रमुख रवी पाटील, माजी नगरसेवक प्रशांत काळे, मयूर पाटील, जयवंत भोईर,



माधुरी काळे, रामदास कारभारी, विजय देशेकर, दिलीप गायकवाड यांच्या सह पदाधिकारी उपस्थित होते.

त्यानिमित्ताने माहिती देताना जिल्हा प्रमुख गोपाळ लांडगे यांनी सांगितले की शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार 1978 पासून श्री मलंगगड लढा सुरु आहे. त्या नंतर धर्मवीर आनंद दिघे यांनी सुरु ठेवलेला हा लढा आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे. श्री मलंगगड लढ्याबाबत न्यायालयात दावे सुरु आहेत. याला नक्कीच यश येईल ज्या प्रमाणे कल्याण दुर्गाडी किल्ला लढा विजयी झालो त्या प्रमाणे श्री मलंगगड लढा हि जिंकणार असा विश्वास गोपाळ लांडगे यांनी व्यक्त केला. प्रतिवर्षी प्रमाणे यानडा देखील शिवसैनिक मोठ्या संख्येने श्री मलंगगडावर श्री मलंगबाबांच्या दर्शनासाठी जातील. दुपारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्याहस्ते मलंगबाबांच्या समाधीस आरती होईल. श्री मलंगगड यात्रेबाबत माहिती देतांना दिनेश देशमुख यांनी सांगितले की 12 फेब्रुवारी पासून पाळखी सोहळयाला सुरुवात होणार आहे. यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. नवनाथ सांप्रदायातील मच्छिंद्रनाथ यांचे स्थान आहे, तसे पुरावे हि आहेत. तसेच श्री पिर हाजीमलंग साहेब दर्गा ट्रस्ट नावे नोंदवले आहे, ते चुकीचे आहे. याबाबत अ प्रमाणपत्र मिळावा म्हणून न्यायालयात दावा सुरु आहे. हिंदुंचे अनेक पुरावे आहेत. तसेच वर्षभर विविध कार्यक्रम सुरू आसतात. रामनवमी, गुरूपौणिमा,रंक्षाबंधन, ललित पंचमी, दहिहंडी, दिवाळी पाडवा, प्रत्येक महिन्यात येणाऱ्या पौर्णिमेला कार्यक्रम करण्यात येतात अशी माहिती दिनेश देशमुख यांनी दिली.

# उल्हासनगरात एकाच नंबरप्लेटच्या दोन रिक्षा

## दोन रिक्षा व चालक वाहतूक विभागांच्या जाळ्यात




उल्हासनगर : उल्हासनगर शहरात एकाच क्रमांकाच्या नंबर प्लेट असलेल्या दोन रिक्षा राजरोसपणे फिरत होत्या. या रिक्षा चालकांना कोणतीही भीती नसून गेली कित्येक वर्षांपासून ते हा बेकायदेशीर व्यवसाय करत होते. मात्र, ही फसवणूक उल्हासनगर वाहतूक विभागाच्या निदर्शनास येताच, वाहतूक विभागाने या रिक्षाचालकांचा पर्दाफाश केला आहे.
या एकाच क्रमांकाच्या दोन रिक्षा आणि बनावट चालकांना आता अटक झाली आहे.

उल्हासनगरच्या फॉरवर्ड लाईनवर धावणाऱ्या एकाच क्रमांकाच्या दोन रिक्षा वाहतूक पोलिसांनी पकडल्या, यातून फसवणुकीचा मोठा प्रकार उघडकीस आला आहे. एकाच रिक्षाचालकाने कायदेशीर कारवाईच्या भीतीने आपल्या रिक्षाचा क्रमांक बदलून गेल्या सहा महिन्यांपासून त्याच बनावट क्रमांकाने रिक्षा चालवत असल्याचे तपासात निष्पन्न झाले. या वेळी मूळ रिक्षाचालकाला ४,५०० रुपये दंडही भरावा लागला.

वाहतूक पोलिसांनी दोन्ही रिक्षाचालकांना अटकेत घेत रिक्षा ताब्यात घेऊन पुढील तपासासाठी स्थानिक पोलिस ठाण्याच्या ताब्यात दिल्या. हा केवळ एका व्यक्तीने केलेला गुन्हा होता की मोठ्या फसवणुकीचा भाग होता, याचा शोध आता पोलीस घेत आहेत. शहरात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी सतर्कता वाढविण्याची तयारी वाहतूक पोलिसांनी केली आहे.

बनावट नंबर प्लेट असलेले वाहन नागरिकांना व चालकास दिसल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश भामरे यांनी जनतेला केले आहे. अशा प्रकारची फसवणूक थांबवण्यासाठी नागरिकांचे सहकार्य आवश्यक आहे, जेणेकरून वाहतुकीचे नियम नीट पाळले जातील आणि कोणत्याही निष्पाप व्यक्तीला चुकीच्या पद्धतीने दंड आकारला जाणार नाही, असे ते म्हणाले.

# मुरबाडमध्ये रेशन हक्क परिषद संपन्न




मुरबाड : अखिल भारतीय किसान सभा मुरबाड तालुका समितीच्या वतीने रेशन हक्क परिषदेचे आयोजन ५ फेब्रुवारी २०२५ रोजी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह येथे करण्यात आले होते. परिषदेचे उद्घाटन करताना संघटनेचे राज्य खजिनदार कॉ. संजय ठाकूर यांनी अन्न सुरक्षा कायदा सोप्या भाषेत समजावून सांगितला. उपस्थित प्रतिनिधींना मार्गदर्शन करण्यासाठी जनवादी महिला संघटनेच्या राज्य उपाध्यक्ष कॉ. हेमलता पाटील आवर्जून उपस्थित होत्या, त्यांनी त्यांच्या भाषणातून रेशन व्यवस्थे मधील भ्रष्टाचार, रेशन चोरी व गलथान कारभाराचा पाढा वाचला. परिषदेच्या अध्यक्षस्थानी संघटनेच्या राज्य समिती सदस्या कॉ. डॉ. कविता वरे या होत्या त्यांनी त्यांच्या भाषणात अन्न सुरक्षा कायद्याची योग्य अंमलबजावणी करण्यासाठी संघर्ष केल्याशिवाय पर्याय नाही व संघटना त्यासाठी कटिबद्ध आहे असे विषद केले. या रेशन हक्क परिषदेचे प्रास्ताविक कॉ. जगदीश भालके, आभार प्रदर्शन कॉ. लक्ष्मण भांडे व सूत्रसंचालन कॉ. संतोष तुपे यांनी केले. या परिषदेत तीन ठराव संमत करण्यात आले. तसेच नऊ सदस्यांची म्हसा विभाग समिती गठीत करण्यात आली या समितीच्या अध्यक्ष पदी अलका आलम व सचिव पदी पंकज आलम यांची निवड करण्यात आली त्याचबरोबर आकरा समस्यांची देवगाव युनिट समिती सुद्धा गठीत करण्यात आली, या समितीच्या अध्यक्ष पदी नंदा मार्के व सचिव पदी संतोष तुपे यांची निवड करण्यात आली. या परिषदेच्या आयोजनात जगदीश भालके, लक्ष्मण भांडे, संगीता आलम, संतोष तुपे, अनंता अहिरे, मंगळ अहिरे, पंकज आलम व मंगळ डोंगरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# रोजगार निर्मितीसाठी जनजागृती शिबीर

वासिंद : महिलांना रोजगार निर्मितीसाठी सहाय्य मिळावे यासाठी आबिटघर येथे जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

आबिटघर ग्रामपंचायत सरपंच साक्षी संतोष साठे यांच्या वतीने आयोजित व आधार फाऊडेशन यांच्या माध्यमातून तर प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत खादी आणि ग्रामोध्योग आयोग यांच्या सहकार्याने महिलांना बचत गटाच्या व स्वयंरोजगार माध्यमातून आर्थिक सहाय्य व मार्गदर्शन मिळावे यासाठी या जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी खादी ग्रामोद्योग पालघर जिल्हा नोडल अधिकारी अरुण कुमार यादव, पंचायत समिती सभापती अस्मिता लाहांगे, आधार फाऊडेशनच्या अध्यक्षा अपर्णा शिंगटे, सरपंच साक्षी साठे आदींजण उपस्थित होते.

सदर, महिलांना रोजगाराची संधी मिळवून देण्यासाठी आणि त्यांना स्वयंपूर्ण बनवून आर्थिक साक्षर करण्यासाठी कराव्या लागणाऱ्या नियोजना



बाबत योग्य असे मार्गदर्शन नोडल अधिकारी अरुण कुमार यादव यांनी केले. तर सरपंच साक्षी साठे या नेहमी असे विविध समाजोपयोगी उपक्रम राबवून आपल्या सरपंच पदाचा गौरव वाढवत असल्याचा अभिमान वाटतो असे सभापती अस्मिता लाहांगे यांनी त्यांचे कौतुक केले. तसेच आधार फाऊडेशनच्या अध्यक्षा अपर्णा शिंगटे यांच्या संकल्पनेतून या पार पडलेल्या या जनजागृती शिबिरात मोठ्या संख्येने महिला बचत गटाच्या पदाधिकारी व महिलांनी उपस्थिती दर्शविली होती.

# स्व स्वास्थ्यासाठी महिलांनी वेळ काढणे गरजेचे

## - केडीएमसी आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़

कल्याण : आजच्या महिलेवर घरातल्या जबाबदारी बरोबर ऑफीसमधील ताणही असतो आणि या सर्वांचा शरीरावर विपरीत परिणाम होवू नये म्हणून प्रत्येक महिलेने स्वत:साठी वेळ काढणे अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी आज केले.

जागतिक कॅन्सर दिनाचे औचित्य साधून कल्याण डोंबिवली महानगरपालिका आणि फोर्टीज हॉस्पिटल, कल्याण यांच्या संयुक्त विद्यमाने महापालिकेच्या स्थायी समिती सभागृहात महापालिका मुख्यालयातील पुरुष कर्मचा-यांसाठी ओरल स्क्रिनिंग व महिला वर्गासाठी आयोजिलेल्या ब्रेस्ट स्क्रिनिंग आणि मोफत कर्करोग स्क्रिनिंग शिबीराच्या शुभारंभसमयी बोलताना महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी हे प्रतिपादन केले.

स्वत:ची जीवनशैली आणि खाण्याच्या सवयी चांगल्या ठेवल्या तर महिला निश्चितपणे स्वत:चे स्वास्थ चांगले राखू शकतील. फोर्टीजच्या सहकार्याने आज संपन्न झालेल्या कर्करोग तपासणी शिबीराचा लाभ महापालिकेतील महिला अधिकारी व कर्मचारी वर्गास निश्चितच होईल, असे सांगत महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी




जाखड़ यांनी फोर्टीज हॉस्पिटलने केलेल्या सहकार्याबाबत त्यांचे आभार मानले.
कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या आयुक्त पदी प्रथमच एक महिला, आयुक्त पदी विराजमान झाल्या आहेत. एक महिला आयुक्त म्हणून महिलांना जाणवणा-या शारिरीक समस्या व त्यावर करावयाच्या उपाययोजना या बाबी लक्षात घेवून स्वत: पुढाकार घेऊन, महापालिका आयुक्तांनी हे शिबीर फोर्टीज हॉस्पिटलच्या सहाय्याने महापालिका मुख्यालयात आयोजित केले होते. या शिबीराचा लाभ महापालिकेतील अनेक अधिकारी व कर्मचारी वर्गाने घेतला.
या शिबीरात फोर्टीज हॉस्पिटलचे कर्करोग तज्ञ डॉ.हर्षित शहा आणि डॉ.उमा डांगी यांनी वेगवेगळया प्रकारचे कॅन्सर्स, त्याची लक्षणे, निदान व त्यावरची उपचार पध्दती याबाबत उपस्थितांना महत्वपूर्ण माहिती विशद केली. या शिबीराचे आयोजनात फोर्टीज हॉस्पिटलच्या माधवी वारीक यांनी महत्वपूर्ण भूमिका बजाविली.
या शिबीर समयी महापालिकेच्या वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.दीपा शुक्ला यांनी प्रास्ताविक केले आणि हे शिबीर यशस्वी होण्यासाठी महापालिकेतील डॉ.सुहासिनी बडेकर, डॉ.प्रतिभा पानपाटील, डॉ.सतेजा शर्मा, डॉ.रश्मी ठाकुर, डॉ.रेखा दौंड तसेच वैद्यकीय आरोग्य विभागातील इतर अधिकारी व कर्मचारी वर्गाने परिश्रम घेतले.

अशा प्रकारच्या शिबीराचे आयोजन महापालिकेच्या प्रभागात देखील करण्याचा मानस असल्याची माहिती महापालिकेच्या वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.दीपा शुक्ला यांनी दिली.

# सेझला घेतलेल्या जमिनी परत करा

## - सी.आर म्हात्रे

पेण : रायगड जिल्ह्यातील सेझ,विशेष आर्थिक क्षेत्रासाठी संपादित केलेल्या जमिनी विकासकाने वचनपूर्ती केली नाही.केंद्र सरकारने परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी सन २००० मध्ये आपले धोरण जाहीर केले. कमीतकमी नियंत्रण,जास्तीतजास्त सवलती, अत्याधुनिक पायाभूत सुविधा,रस्ते,पाणी वीज, यामुळे आर्थिक विकासाला चालना मिळेल यासाठी देशभरासह विविध ठिकाणी विविध राज्यात हे सेझ विभाग निवडले. गुजरात.येथे कांडला ,महाराष्ट्र राज्य मुंबई,उत्तर प्रदेश नोएडा तामिळनाडू ,चेन्नई,. केरळ कोचीन,आंध्र प्रदेश विशाखपट्टणम ,पश्चिम बंगाल phalta. अश्या ठिकाणी सेझ विकसित करण्याचे निश्चित केले

रोजगारात प्रचंड वाढ हा उद्देश, यासाठी परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी विशेष आर्थिक क्षेत्र विधेयक संसदेत संमत करून २३ जून २००५ रोजी कायद्यास राष्ट्रपतींची स्वाक्षरी मिळाली . १० फेब्रुवारी २००६ मध्ये विशेष आर्थिक क्षेत्र नियम लागू झाला.त्यानंतर सेझ विकासकांना आकर्षित करण्यासाठी, विविध प्रकारे सवलती दिल्या जातात. त्याचा उहापोह वर झालेला आहे..

सेझचे महत्वाचे उद्दिष्ट म्हणजे वाढीव आर्थिक क्षेत्र निर्माण करणे,वस्तू सेवा निर्यातीस चालना देणे.देशी,विदेशी गुंतवणुकीस परवानगी देणे.रोजगाराच्या संधी निर्माण करणे.पायाभूत सुविधांची निर्मिती करणे.हे क्षेत्र विकसित करताना केंद्र,राज्य सरकार ४५ दिवसातच मंजुरी देतात यासाठी विविध ठिकाणच्या परवानग्या, एकल खिडकी,सुविधा उपलब्ध असते त्यामुळे वेळेची बचत होते. यासाठी जी १९ सद्स्य असणाऱ्या समितीचा अध्यक्ष वाणिज्य विभागाचे सचिव असतात त्यामुळे कोणतीही परवानगी तात्काळ मिळते.एवढेच नव्हे तर विविध आर्थिक सवलती सरकारने दिल्या आहेत त्यामध्ये सीमाशुल्क,आणि उत्पादन शुल्क माफ असते.१५ वर्ष पैकी १० वर्ष आयकर माफ. लाभांश यावरील कर माफ केंद्रीय विक्रीकर माफ. सेवा शुल्कात सुट यामुळे देशी,विदेशी गुंतवणुकीस चालना मिळेल हा उद्देश. या मोठ्या प्रमाणावरील सवलती देऊन सुद्धा १ जानेवारी २०१६ पर्यंत ४१५ सेझ साठी मान्यता दिली गेली. पैकी ३२९ सेझ अधिसूचित करण्यात आले.यामध्ये २०५ सेझ कार्यान्वित आहेत.मात्र केंद्र सरकार,राज्य सरकारने ज्यासाठी हा कायदा संमत केला तो १०० टक्के सफल झाला नाही हे दिसून येते.महालेखा परीक्षकांच्या म्हणण्यानुसार अजून संपादित केलेल्या जमिनिपैकी सुमारे ५२ टक्के जमिनी वापरल्या गेल्या नाहीत.१४ टक्के जमिनी इतर व्यावसायिक कामासाठी वापरल्या गेल्या आहेत.पैकी ५० ते ६० टक्के क्षेत्र माहिती व तंत्रज्ञान यासाठी वापरल्या गेल्या आहेत. बहु उत्पादन क्षेत्र फक्त ८ ते ९ टक्केच आहे. यामुळे जो आर्थिक विकास गृहीत धरला होता तो साध्य झालेला दिसून येत नाही. खालील आकडेवारी काय सांगत आहे ते पहाण्याजोगे आहे.१ जानेवारी २०१६ पर्यंत ३०७६ कोटी ची गुंतवणूक झाली होती.किती लोकांना रोजगार निर्मिती झाली हे पहाण्याजोगे आहे.महत्वाचं मुद्दा हा आहे की जर एवढ्या मोठ्या प्रमाणावर सवलती असून सुद्धा आपल्या रायगड मधील ज्या जमिनी खरेदी केल्यात त्यांचा वापर का केला नाही. ज्या जमिनी खरेदी केल्यात त्यांचे व्यवहार ,दस्त ती चार प्रकारचे आहेत. काही सेझचे सात बारा झालेत,तर काही pending दस्त दिसतात. काही ठिकाणी शेतकरी जमीन नुकसान भरपाई रिलायन्स इंडस्ट्रीज आपल्याकडे वर्ग करत आहे असे समजते.वास्तविक कोणताही विकास केला गेला नाही. म्हणून रायगड मधील शेतकरी कायदेशीर लढाई लढत आहे तर दुसरीकडे सनदशीर मार्गाचा वापर करत आहेत.सरकार बदलले,मंत्री महोदय बदलले,मात्र त्यांनी दिलेला शब्द पूर्ण केला नाही.मंत्रालयात झालेल्या बैठका ,त्याचा फायदा शेतकऱ्यांना झालेला दिसत नाही.विकासक धनाढ्य आहेत ,शेतकरी गरीब आहे.मात्र ही मोठी लढाई आहे.ज्यासाठी जमीन संपादित केली,जे वचन दिले त्याची पूर्तता सुमारे १७/१८ वर्ष होऊन झाली नाही म्हणून त्या जमिनी त्या शेतकऱ्यांना परत कराव्या.सातबारा कोरा करावा. ही सर्वांची अपेक्षा असल्याची मागणी समस्त शेतक-यांच्या वतीने वाशी खारेपाटातील सामाजिक कार्यकर्ते सी.आर.म्हात्रे यांनी केली आहे.

# अंगणवाडी भरती प्रक्रियेत आमिषाला बळी पडू नका

## - मंत्री आदिती तटकरे

मुंबई : महिला व बालविकास विभागाअंतर्गत एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाडीत पर्यवेक्षकीय अधिकारी, संरक्षण अधिकारी, अधीक्षक ही पदे भरण्यात येत आहे. भरती प्रक्रिया अतिशय पारदर्शक पद्धतीने होणार असून, कोणत्याही आमिषाला बळी पडू नये, असे आवाहन महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केले आहे. राज्य शासनाच्या 100 दिवस उद्दीष्टपूर्ती अंतर्गत एकात्मिक बालविकास सेवा योजनेतील रिक्त पदांची भरती विभाग करीत आहे. परीक्षा केंद्रांवर जॅमर बसविण्यास येणार आहे. सरळसेवा व पदोन्नती प्रकारातील पद भरती प्रक्रिया संदर्भातही कार्यवाही सुरू आहे. ही भरती प्रक्रिया पारदर्शक होण्यासाठी शासन यंत्रणा सज्ज असून, उमेदवारांनी कोणत्याही आमिषाला बळी न पडण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# ठाणे जिल्ह्यातील शासकीय सुट्ट्या जाहीर

ठाणे : ठाणे जिल्हा महसूल हद्दीतील शासकीय कार्यालयांसाठी शासनाने सन 2025 करिता जाहीर केलेल्या सार्वजनिक सुट्टयांव्यतिरीक्त तीन सार्वजनिक सुट्ट्या कोंकण विभागीय महसूल आयुक्त डॉ. राजेश देशमुख यांनी परिपत्रकाव्दारे जाहीर केल्या आहेत.
ठाणे जिल्हा महसूल हद्दीतील शासनाच्या सर्व खात्यांमधील कार्यालयांकरिता शासनाने सन 2025 करिता जाहीर केलेल्या सार्वजनिक सुट्टयांव्यतिरिक्त दि. 08 ऑगस्ट 2025 शुक्रवार नारळी पौर्णिमा, दि. 02 सप्टेंबर 2025 मंगळवार जेष्ठागौरी विसर्जन, दि. 20 ऑक्टोंबर 2025 सोमवार नरक चतुर्दशी या तीन स्थानिक सुट्टया जाहीर करण्यात आल्या आहेत. शासन ठराव राजनैतिक व सेवा विभागाकडील दि. 16 जानेवारी 1958 च्या निर्णयातील परिच्छेद क्र. 5 अन्वये विभागीय आयुक्त कोकण विभाग यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार हे करण्यात आले आहे.
या दिवशी ठाणे जिल्हयातील सर्व शासकीय कार्यालये बंद राहतील. असे कोकण विभागीय महसूल आयुक्त डॉ. राजेश देशमुख यांनी एका प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९१९०८२६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024